वाहनाकरिता बँकेने दिलेले कर्ज मुदतीच्या आंत वसुल न झाल्यास अशा वाहनाची जप्ती करून लिलावाद्वारे विकण्यांत येतात. अशा प्रकारे विकल्या जाणाऱ्या वाहने खरेदी करणेकरिता बँकेतून कर्ज उपलब्ध करून देण्याचे धोरण आहे. या धोरणा अंतर्गत लिलावाअगोदर लिलाव करण्यांत येणाऱ्या वाहनाचे मुल्यांकन करून घेतल्या जात असते. लिलावातिल वाहनाचे तारणावर कर्ज उपलब्ध करून देतांना बँकेचे सद्याचे धोरणानुसार लिलावातील वाहनाचे ठरविण्यांत आलेली मुल्यांकन रक्कम अथवा लिलावांतील अंतिम बोलीची रक्कम यापैकी जी कमी असेल त्या रकमेच्या ६०% (साठ टक्के) पर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यांत येते.

सद्याचे धोरणानुसार लिलावातील ट्रॅक्टर खरेदीकरिता उपलब्ध करून देण्यांत येत असलेली कर्जाची रक्कम कमी पडत असल्यामुळे अंतिम बोलीच्या ७०% (सत्तर टक्के) पर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यांत यावे अशी कांही कास्तकारांनी विनंती केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या तारणांतील जप्त केलेले वाहन लिलावाद्वारे विकण्यांत येणाऱ्या जीप व ट्रॅक्टर ह्या वाहनांच्या खरेदीकरिता सदर वाहनाचे मुल्यांकन गृहीत न धरता अंतिम बोलीची रक्कम गृहीत धरून अंतीम बोली रकमेच्या ६०% (साठ टक्के) पर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे असे ठरले. वरिल बदला व्यतिरिक्त इतर सर्व अटी, नियम हे पुर्वीच्याच धोरणाप्रमाणे राहील. धोरणांतील सदर बदल केवळ जीप व ट्रॅक्टर करिताच लागू असून इतर वाहनाकरिता कर्ज उपलब्ध करून देण्याचे पुर्वीप्रमाणेच धोरण लागू राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ :- बँकेच्या अद्यावत कर्ज वसुलीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक २९.९.२००१ चे सभेत बँक कर्जाची वसुली प्रभावीपणे करण्याकरिता कृती कार्यक्रम मंजूर करण्यांत आला आहे. या अंतर्गत सभासदांच्या कर्ज मागणी याद्या कापूस संकलन केंद्रावर, साखर कारखाना कृषि उत्पन्न बाजार समिती इत्यादि ठिकाणी पाठविण्यांत आल्या आहेत. तसेच ग्रिन कार्ड सर्व कापूस संकलन केंद्रावर उपलब्ध करून देण्यांत आले आहेत. सर्व थकबाकीदार सभासदांना कर्जमागणी सुचनापत्रे, जप्तीपूर्व नोटीसेस देण्यांत आले आहेत. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त सभासदांशी संपर्क साधण्याकरिता प्रत्येक तालुक्याला एक जीपगाडी नोव्हेंबर २००१ पासून वसुलीचे

कामासाठी देण्यांत आली आहे. २००१-२००२ च्या वसुली हंगामात वसुलीकरिता पोषक वातावरण तयार करण्याचे दृष्टीने वसुली सभांचा तालुका स्तरावर जानेवारी २००२ मध्ये कार्यक्रम आयोजीत करण्यांत आला. व या सभेत कर्ज वसुलीचा आढावा घेण्यांत आला. बँकेची माहे डिसेंबर २००१ अखेर मुद्दलांत वसुली रुपये ३३०.६६ लाख व व्याजांत वसुली रुपये ४५५.२७ लाख अशी एकूण वसुली रुपये ७८५.९० लाख झाली असून वसुलीचे शेकडा प्रमाण २.८१ आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन थकबाकीदार सभासदांकडून वसुलीची मोहीम तिव्रगतीने कार्यान्वित करणेत यावी व कर्जवसुलीचे लक्षांक पूर्तीसाठी प्रयत्न करण्यात यावी. बँकेच्या अद्यावत वसुलीची दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ७ :- बँकेचे सरव्यवस्थापक श्री. ए. एन. चौधरि यांचे परसेवेच्या कालावधी संपत असल्याने त्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील मुख्याधिकारी श्रेणीचे अधिकारी श्री. ए. एन. चौधरी हे दिनांक २६.८.१९९९ पासून सरव्यवस्थापक म्हणून आपल्या बँकेत परसेवेवर काम करीत आहेत. मागील वर्षी वाढविण्यांत आलेला एक वर्षाचा परसेवेवरील कालावधी दिनांक २५.१.२००२ रोजी संपत आहे.

श्री. ए. एन. चौधरी यांनी मागील साडेआठ वर्षांपासून सरव्यवस्थापक म्हणून पदभार यशस्वीरित्या सांभाळलेला आहे. आजची बँकेतील परिस्थिती विचारांत घेता त्यांच्या सेवेची बँकेला गरज आहे. त्यामुळे श्री ए. एन. चौधरी यांचे परसेवेचा कालावधी आणखी दोन वर्षांने म्हणजे दिनांक २५.१.२००४ पर्यंत वाढविण्यांत यावा व अशी विनंती महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई यांना करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ८(१) :- बँक कर्मचाऱ्यांना घरबांधणी कर्ज मंजुरीसाठी असलेल्या कर्ज धोरणांत बदल करणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८(१) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की,

बँकेने दिनांक ६.६.२०००चे सभेत बँक कर्मचाऱ्यांना घरबांधणी कर्ज सुविधा योजने अंतर्गत कर्ज मंजुरीसाठी सुधारित कर्ज धोरणास मंजुरी दिली आहे. त्याप्रमाणे बँकेने परिपत्रक काढून परिपत्रक क्रमांक कर्ज विभाग/कर्मचारी घरबांधणी/२०००-२००१/ ३८८६ दिनांक ६.६.२०००नुसार कर्मचाऱ्यांना कळविण्यांत आले आहे. त्यामधील नियम क्रमांक १२(१)नुसार कर्मचाऱ्यांचे नांवाने असलेल्या स्वमालकीच्या प्लाटवर घर बांधण्यासाठी कर्ज मिळेल असे कर्ज धोरणांत नमुद आहे. तथापी बँकेतील कांही कर्मचाऱ्यांकडून त्यांचे पतीचे नांवाने असलेल्या प्लॉटवर घराचे बांधकामासाठी कर्जमागणी करिता अर्ज केले आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँक कर्मचाऱ्यांचे पती किंवा पत्नीच्या नांवाने प्लॉट असल्यास त्या कर्मचाऱ्याला बँकेकडून घर बांधणी करिता घरकर्ज साठी असलेल्या प्रचलित व्याजदरापेक्षा ०१% (एक टक्के) जादा व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्यांत यावे असे ठरले. मात्र घरबांधणी करण्याकरिता कर्ज मागणाऱ्या कर्मचाऱ्यास पती किंवा पत्नीचे नांवाने असलेला प्लॉट बँकेला गहाण करण्याकरिता संमती द्यावी लागेल. तसेच त्यांना या कर्जाचे सहकर्जदार बनावे लागेल. वरील दुरुस्ती व्यतिरिक्त इतर सर्व अटी, नियम हे पूर्वीच्याच धोरणाप्रमाणे राहतील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८(२) :- बँकेच्या वसुली अधिकाऱ्यास महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०चे कलम १५६ अंतर्गत पुढील आदेशापर्यंत वसुलीचे अधिकार मिळणेबाबत मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ८(२) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, वसुलीचे अधिकार प्रदान करण्यांत आलेले कामठी तालुक्याचे विशेष वसुली अधिकारी श्री एस.आर. वरुडकर बँकेचे सेवेतून माहे एप्रिल २००१मधील ६ तारखेला सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे सेवानिवृत्तीनंतर त्यांचेकडे असलेल्या चार्जमधील थकीत कर्ज प्रकरणांची वसुली करणेकरिता कामठी शाखेचे निरिक्षक श्री आर. एन. वाघमारे "ब" वर्ग अधिकारी यांना विशेष वसुली अधिकारी म्हणून मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे दिनांक २१ मार्च २०००चे पत्राप्रमाणे अधिकार मिळणेबाबत मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावयाची आहे. श्री. आर. एन. वाघमारे यांचे मुख्यालय शाखा कामठी राहणार असून कार्यक्षेत्र नागपूर जिल्हा राहील. श्री वाघमारे यांना महाराष्ट्र सहकारी

संस्था कायदा १९६० चे कलम १४८(१)(अ)(ब)(क) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० चे कलम २(एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील उपनियम (३), (५), (६), (८), (९), (१०), (११) (अपसेट प्राईस कायम करण्याची तरतुद वगळून) (१२), (१३), (१४), (१७), (१८) व (२०) तसेच कलम १०१ व १३७ नुसार अधिकार प्रदान होणेस्तव मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यात यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८(३):- सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाकरिता बँकींग प्लॅन अंतर्गत नाबार्डकडून मंजूर असलेल्या कर्ज मर्यादेमध्ये अंतर्गत बदल करणेकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस विनंती करणे.

ठराव क्रमांक ८(३):- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाकरिता बँकींग प्लॅन अंतर्गत विविध कर्ज कारणाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रुपये ६३५.०० लाखाच्या फेरकर्ज मर्यादा मंजूर आहेत. सदर फेरकर्ज मर्यादा उचलीची मुदत ३१ मार्च २००२ पर्यंत आहे. बँक स्तरावरील विविध कारणाकरिता झालेल्या कर्जवाटपाची आंकडेवारी विचारांत घेता फेर कर्ज मर्यादेवर जास्तीत जास्त उचल करावयाची झाल्यास बँकींग प्लॅन अंतर्गत मंजुर असलेल्या फेर कर्ज मर्यादे अंतर्गत बदल करणे आवश्यक आहे. याकरिता मंजुर केलेल्या एकूण मर्यादे अंतर्गत पुनर्रचना करून कर्जप्रकार निहाय सुधारीत कर्ज मर्यादा मंजुरीकरिता प्रस्ताव राज्य बँकेस पाठविणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन फेरकर्ज मर्यादेवर मंजूर मर्यादे अंतर्गत जास्तीत जास्त उचल करता यावी यासाठी कर्जप्रकार निहाय कर्ज मर्यादेमध्ये खालीलप्रमाणे बदलास मंजुरीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला प्रस्ताव पाठवून विनंती करणेत यावी असे ठरले.

| अ.क्र. | कर्ज कारण | राष्ट्रीय/राज्य बँक मंजूर फेर कर्ज मर्यादा (रुपये लाखांत) | मंजुर करावयाच्या सुधारीत फेर कर्ज मर्यादा (रुपये लाखांत) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | लघु सिंचन | ६०.०० | १६०.०० |
| २. | जमीन सुधारणा | ५.०० | — |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ३. | दुग्ध व्यवसाय | १०.०० | ४०.०० |
| ४. | कुक्कुट पालन | — | ५.०० |
| ५. | शेळी-मेंढी वराह पालन | — | १५.०० |
| ६. | फळबागा लागवड/ग्रीन हाउस | — | १५.०० |
| ७. | मत्स्य व्यवसाय | — | — |
| ८. | शेती, इतर व पाणलोट विकास क्षेत्र | १५०.०० | २५.०० |
| ९. | स्टोअरेज मार्केट यार्ड | — | — |
| १०. | लहान उपसा जलसिंचन योजना | — | ५०.०० |
| ११. | अनुसुचित जाती जमाती | — | — |
| १२. | कृषि यांत्रिकिकरण | ४००.०० | ३५०.०० |
| १३. | एसएचजी | १०.०० | १५.०० |
| १४. | एमआरसीपी. | — | — |
| १५. | स्वर्णजयंती स्वयंग्राम रोजगार योजना | — | ५०.०० |
| १६. | नॉन फार्म सेक्टर योजना | — | — |
| १७. | बायोगॅस / डोमॅस्टीक गॅस | — | १०.०० |
| | एकूण | ६३५.०० | ६३५.०० |

ठराव सर्वानुमते मंजुर

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप.बँक लि., नागपूर.

Eh-1312

Eh.

बॅंकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार दिनांक २६.२.२००२ रोजी दुपारी १.०० वाजतां बॅंकेचे मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बॅंकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ४. मा. श्री. भा. वं. शहाणे | " |
| ५. मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ६. मा. श्री. व. भा. वाढे | " |
| ७. मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| ८. मा. श्री. सं. ली. चोरे | " |
| ९. मा. श्री. श्या. ग. धवड | " |
| १०. मा. श्री. वि. श. हुलके | " |
| ११. मा. श्री. ना. र. जीभकाटे | " |
| १२. मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १३. मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| १४. मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १५. मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १६. मा. श्री. मु. भि. पनासे | " |
| १७. मा. श्री. अ. शं. धार्मीक | " |
| १८. मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| १९. मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २०. मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २१. मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |

२२. मा. श्री. व्ही. जी. देशमुख, सहा. महाप्रबंधक, नाबार्ड तथा मुख्य तपासणी अधिकारी
२३. मा. श्री. एल. दास. सहा. प्रबंधक, नाबार्ड तथा तपासणी अधिकारी.
२४. मा. श्री. मनमोहन सेन, सहा. महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
२५. मा. श्री. बी. व्ही. असवार, विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बॅंक), नागपूर
२६. मा. श्री. व्ही. जी. शहाळे कर्मचारी प्रतिनिधी
२७. मा. श्री. ए. एन. चौधरी, सरव्यवस्थापक.

अनुपस्थित -

१. मा.श्री. र.गो. बंग संचालक

२. मा.श्री. अ.य. गुजर "

३. मा.श्री. चं.ळ. कोल्हे "

४. मा.श्री. वि.आ. राऊत "

५. मा.श्री. ब.श्रा. तायवाडे "

६. मा.श्री. अ.ना. पोरेड्डीवार, प्रतिनिधी, म.रा.सह.बँक लि., मुंबई.

७. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर.

८. मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर.

९. मा. विभागीय अधिकारी, म.रा. सह. बँक लि., विभागीय कार्यालय, नागपूर.

१०. मा. श्री. एल.जी. चौधरी कर्मचारी प्रतिनिधी

संचालक मा.श्री. र.गो. बंग, श्री. अ.य. गुजर, श्री. चं.ळ. कोल्हे, श्री. वि.आ. राऊत श्री. ब.श्रा. तायवाडे सभेला उपस्थित नसल्याने त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली. सर्वप्रथम सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांनी नुकत्याच पार पडलेल्या नागपूर महानगरपालिका नागपूरच्या निवडणुकीत बँकेचे संचालक श्री ग.के. शाहिर वार्ड मेंबर म्हणून निवडून आल्याबद्दल तसेच उमरेड पंचायत समिती उमरेडचे निवडणुकीत बँकेचे संचालक श्री. वि.रा. हुलके पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल त्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

रिझर्व बँकेने निर्धारित केलेल्या तत्वाची अंमलबजावणी व बँकींग कायद्यातील तरतुदीप्रमाणे बँकेचे कामकाज नाबार्ड अधिकारी दर दोन वर्षांनी तपासणी घेत असतात. यावेळी दिनांक १एप्रील १९९९ पासून ३१मार्च २००२ पर्यंतचे कालावधीची तपासणी नाबार्ड अधिकारी श्री. व्ही.जी. देशमुख मुख्य तपासणी अधिकारी तथा सहा. महाप्रबंधक, नाबार्ड पुणे व श्री. एल.दास तपासणी अधिकारी तथा सहा.प्रबंधक नाबार्ड पुणे यांनी घेतली असून तपासणीत आढळून आलेल्या महत्वाच्या बाबीवर नाबार्ड अधिकारी चर्चा व मार्गदर्शन करणार आहेत. याबाबत मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयानुसार मा. अध्यक्ष यांनी सभेला सुरुवात केली.

विषय क्रमांक १:- मागील दिनांक १५.१.२००२ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे

अनुषंगाने विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १९.१.२००२ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक १५.१.२००२ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक ३ :- नाबार्ड तपासणी अनुषंगाने महत्वाच्या बाबींवर नाबार्ड अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व मा. संचालकांसोबत चर्चा.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी नाबार्डचे सहाय्यक महाप्रबंधक श्री व्ही. जी. देशमुख मुख्य तपासणी अधिकारी यांना तपासणीत आढळून आलेल्या महत्वाच्या बाबींवर मार्गदर्शन व चर्चा करण्याकरिता विनंती केली. श्री. व्ही. जी. देशमुख मुख्य तपासणी यांनी मार्गदर्शन भाषणाला सुरुवात करतांना तपासणी कालावधीत तपासणी कामाकरिता सहकार्य केल्याबद्दल बँकेचे अध्यक्ष सरव्यवस्थापक, व्यवस्थापक व अधिकारी यांचे प्रथम आभार मानले. जिल्हा सहकारी बँकांमध्ये रिझर्व बँकेने निर्धारित केलेल्या तत्वांची अंमलबजावणी व बँकींग कायद्यातील तरतुदीप्रमाणे बँकेचे कामकाज तपासणे हे नाबार्ड तपासणीचे मुख्य उद्देश आहेत. बँकेच्या कामकाजाबाबत दिनांक १.४.१९९९ ते ३१.३.२००१ या कालावधीत तपासणी घेतली असून बँकेने भरीव कामगिरी केल्याचे तपासणीत दिसून आले आहे. बँकेच्या स्वभाग भांडवल, ठेवी, स्वकृत भांडवल, गुंतवणूक, कर्जे इत्यादिमध्ये झालेली वाढ चांगली आहे. परंतु बँकेत असलेल्या ठेवीतील मुदती ठेवीचे प्रमाण एकूण ठेवीच्या ६०%च्या वर आहे. हे प्रमाण ५०% पर्यंत कमी करण्यांत यावे. बँकेचे ठेवीचे व्याज दर तुलनात्मकरित्या जास्त असल्यामुळे व्याजदरांत बदल करणेबाबत बँकेचे संचालक मंडळाने निश्चित विचार करावा. तसेच नाबार्डकडील कमी व्याज दराने मिळणाऱ्या फेरकर्जाचा सुद्धा वापर करणेबाबत

विचार करावा. वैयक्तीक भागीदारी संस्थांना कर्जवाटप करतांना नाबार्डने घालून दिलेल्या नामर्मधील मर्यादेप्रमाणे कर्जवाटप व्हायला पाहिजे होते तरी दिनांक ११.४.२०००चे नाबार्डचे पत्राप्रमाणे नाबार्डने घालून दिलेल्या मर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच युनिटना कर्जवाटप करतांना कोऑपरेटीव्ह व नॉन कोऑपरेटीव्ह फोल्ड मधील नाबार्डने ठरवून दिलेल्या सिंगल बारोअर एक्सपोझर मर्यादेचे पालन करण्यांत यावे. बँकेकडे प्राप्त होणारे कर्ज प्रस्तावाचे तपासणीची अप्रेझल सिस्टीम (Appraisal System) निर्दोष असावी. कर्ज प्रस्तावाचे तपासणीच्या अप्रेझल रिपोर्ट बँकेचे दप्तरी प्रमाणपत्रासहित उपलब्ध ठेवण्यांत यावा. बँकेने अनुत्पादक कर्ज किती आहे याबाबत अधिक सविस्तर माहिती ठेवणे आवश्यक होते. उपलब्ध माहितीवरुन बँकेचे अनुत्पादक कर्ज अचुक असल्याबाबत अर्थबोध होत नाही. वैयक्तीक भागीदारी संस्थांना देण्यांत येणाऱ्या कर्ज व्यवहारावर बँकेचे सुरक्षिततेचे दृष्टीने अंतर्गत नियंत्रण (Internal check) ठेवणे आवश्यक आहे. रिकंसीलिशन मध्ये सहा महिन्याचे वरील व रुपये १०,०००/-पेक्षा जास्त रकमेच्या नोंदी फार मोठ्या प्रमाणावर प्रलंबीत आहेत. बँकेचे शाखा व्यवस्थापक, मुख्याधिकारी, यांना त्यांचे स्तरावर निर्णय घेण्यास अनेक अडचणी असल्याचे दिसून आले. तेव्हा बँकेचे अधिकाऱ्यांना कांही मर्यादेपर्यंत अधिकार प्रदान केल्यास बँकेचे कामकाज अधिक सुरक्षीत होईल.

यानंतर श्री. एल. दास तपासणी अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक नाबार्ड पुणे यांनी चर्चा करतांना सांगीतले की, जास्त व्याज दराच्या ठेवींचे प्रमाण एकूण ठेवींमध्ये जास्त असल्यामुळे बँकेच्या नफ्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही असे सुचविले. कांही शाखांमध्ये संपत्तीचे वर्गीकरण योग्य पध्दतीने काढले नसल्यामुळे अनुत्पादक कर्ज अचुक असल्याचा अर्थबोध होत नाही. बँकेतून सेवानिवृत होणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपदानाची रक्कम उपदान अधिनियम १९७२ मधील नियमांत झालेल्या सुधारणेनुसार निश्चित करुन देण्यात यावी. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या उपदान रकमेची दरवर्षी नियमाप्रमाणे तरतुद करणेत यावी. बँकेने सेक्युरिटीजचा केलेला व्यवहार चांगली मिळकत मिळवून देणारा आहे. परंतु असा व्यवहार हाताळणारा अधिकारी किंवा कर्मचारी अति दक्षता घेउन सावधगिरीने काम करणारा असावा असे सुचविले.

Seen/

तसेच ह्या व्यवहाराचा त्रैमासीक आढावा घेणे (Review) आवश्यक आहे

यावर मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, बँकेतून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपदानाची रक्कम उपदान अधिनियम १९७२ मधील सुधारीत नियमानुसार देण्याबाबत कार्यवाही करणेत येईल. या संदर्भात आजचे सभेत विषय ठेवण्यांत आला आहे. तसेच ठेवीवरील व्याजदराबाबत विचार करणेकरिता सुध्दा विषय आजचे सभेत ठेवण्यांत आला आहे. नाबार्डकडून फेरकर्ज मंजुरीसाठी व त्यावर उचल मिळणेसाठी प्रस्ताव पाठविणेकरिता आजचे सभेत निर्णय घेण्यांत येणार आहे. नाबार्ड तपासणीत आढळून आलेल्या प्रमुख बाबींवर चर्चा करतांना नाबार्डचे मुख्य तपासणी अधिकारी व तपासणी अधिकारी यांनी केलेल्या सुचनाप्रमाणे कार्यवाही करणेत येईल व असलेल्या त्रुट्या दुर करण्यांत येईल असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक ४ :- बँकेचे ठेवीवरील व्याजदरांत बदल करणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. संचालक मंडळाचे दिनांक २०.३.१९९९चे सभेतील निर्णयानुसार दिनांक १.४.९९पासून सुधारीत व्याज दर अमलांत आहेत. बँकेच्या २५.१.२००२चे ताळेबंदानुसार एकूण ठेवी पैकी मुदती ठेवींचे प्रमाण ७१.४०% आहे. दिनांक ३०.९.२००१ ला संपलेल्या अर्धवार्षिक हिशोबावर आधारीत सरासरी कॉस्ट ऑफ डिपाजिट ९.३०% आहे. ठेवीदार फार मोठ्या प्रमाणावर मुदती ठेवी आपले बँकेत दिर्घकालावधीकरिता ठेवीत असल्याने भविष्यांत बँकेवर ठेवीपोटी पडणाऱ्या देय व्याजाच्या बोझा विचारांत घेता सद्य:स्थितीतील ठेवींचे व्याजदरांत बदल करावा किंवा कसे ह्यावर विचार व्हावा असे वाटते. ह्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. जिल्हा सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, नागरी बँका इत्यादिंचे वर्तमान व्याजदर, तुलनात्मक अभ्यासाकरिता सादर केले आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन बँकेतील ठेवीवरील व्याजदरांत योग्यवेळी बदल करण्याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक ५ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे
विषय क्रमांक ५(१) :- स्वयंसहाय्यता बचत गट व स्वर्ण जयंती स्वंयरोजगार योजने अंतर्गत बचत गटांना कर्जवाटपाचे धोरण ठरविणे.

ठराव क्रमांक ५(१) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, ग्रामिण भागातील दारिद्र्य निर्मुलनाकरिता स्वावलंबी महिला तथा पुरुष किंवा महिला महिला व पुरुष अशा मिश्र गटांची ग्रामिण भागांत स्थापना करण्यांत आलि आहे. पंचायत समिती व बँकस्तरावर केलेल्या ग्रेडेशननुसार "अ" किंवा "ब" ग्रेड प्राप्त झालेल्या परंतु शासन व बँकेचे निकष पूर्ण करणाऱ्या व जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेनी कर्जासाठी शिफारस केलेल्या गटांना त्यांच्या सदस्याकरिता कर्ज मंजुरीचे धोरण तयार करण्यांत आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बचत गटांना त्यांच्या सदस्यांकरिता कर्ज मंजुरीचे खालिलप्रमाणे असलेल्या धोरणास मंजुरी देण्यांत येत आहे.

<u>बचत गटांना कर्ज मंजुरीचे धोरण</u>

१. महिला, पुरुष अथवा मिश्र स्वंयसहायता बचत गटातील सदस्य संख्या १० ते २० च्या दरम्यान असावी. बचत गटांचे श्रेणीकरण करण्यांत आले असून गटाला 'अ' किंवा 'ब' श्रेणी मिळालेली असावी. श्रेणीकरणाबाबत पंचायत समितीकडून प्राप्त झालेले प्रमाणपत्र गटाने कर्जमागणी अर्जासोबत सादर करावे.

२. बचत गटाचे गटातील संपूर्ण सदस्यांच्या संयुक्त सहीचा कर्ज मागणी अर्ज बँकेला सादर करावा. सदर अर्जासोबत कर्ज मंजुरीची मागणी करणारा बचत गटाचा ठराव तसेच कर्ज व बँक खात्याचे व्यवहार करण्यास अधिकार प्रदान केल्याबाबतचा गटाचा ठराव कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावा.

३. बचत गट स्थापन झाल्यापासून गटाने केलेल्या आर्थिक व्यवहाराचा जमाखर्च व ताळेबंद बचत गटास कर्ज मागणी अर्जा सोबत सादर करावा.

४. शासनाकडून बचत गटास कर्जान्तर्गत मिळणारे अनुदान व बचत गटाने केलेल्या मागणीनुसार गटास कर्ज मंजुरी देण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्र जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेकडून कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावे.

५. गटातील सर्व सदस्य एकाच गावातील रहिवाशी असावेत.

त्या सर्वांची नांवे ग्रामपंचायतीचे रेकार्डला नोंदलेली असावी व तसे ग्रामपंचायत सचिवांचे प्रमाणपत्र सादर करावे.

६. गटाला ज्या कारणासाठी कर्ज पाहिजे त्या संबंधीत व्यवसायाचा आर्थिक व तांत्रीक क्षमतेबाबतचा आराखडा कर्ज मागणी अर्जासोबत गट प्रमुखाचे सही व शिक्यानिशी सादर करावा. गटने सादर केलेल्या कर्ज मागणी प्रकरणांच्या विचार करतांना ग्रामीण भागांतील शेतीवर आधारीत उद्योगानाच प्राथमिकता देण्यांत येईल.

७. गटाने केलेल्या मागणीनुसार किमान कर्ज रकमेच्या दिडपट किमंतीची स्थायी संपत्ती गहाणांत द्यावी लागेल. गहाणांत द्यावयाची स्थायी संपती म्हणून गटातील सदस्याची स्वमालकीची अथवा त्यांचे कुंटुबातील असावी. स्थायी संपत्ती म्हणजे शेती किंवा स्वतःचे राहते घर यापैकी कोणताही प्रकारची असावी. स्थायी संपत्ती ही गटातील सदस्यांचीच असावी किंवा त्यांचे कुंटुबातील म्हणजेच आई वडील, भाऊ यापैकी असावी.

८. कर्जाकरिता ज्यांनी स्वतःची स्थायी संपत्ती गहाणांत देण्याचे मान्य केले, त्यांची मालमत्ता गहाणांत देण्यास संमती असल्याबाबत स्टॅंप पेपरवर संमतीपत्र सादर करावे लागेल. सम्मतीपत्रावरील सह्या बॅंकेच्या शाखा व्यवस्थापकांनी प्रमाणीत कराव्यात.

९. कर्ज मागणी करणाऱ्या गटांतील संपूर्ण सदस्यांचे तसेच स्थायी संपत्ती गहाणांत देणाऱ्यांचे स्थानिक व्यापारी बॅंक भुविकास बॅंक, सेवा सहकारी सोसायटी, ग्रामीण बलुतेदार सहकारी संस्थेचे कर्ज नसल्याचे दाखले सादर करावे.

१०. बॅंक कर्जाचा योग्य विनियोग करून कर्जाची नियमित परत फेड करण्याची वैयक्तीक व संयुक्तीक जबाबदारी संपूर्ण गटाची राहील. तसेच कर्जाचा दुरुपयोग झाल्याचे आढळून आल्यास कर्जाची एकमुस्त वसुलीची कार्यवाही करण्याचे अधिकार बॅंकेला राहतील. बचत गटाने त्यांचे व्यवसायाचे उत्पन्नातून तसेच गहाणातील मालमत्ता विक्री करून कर्जाची परतफेड न केल्यास सदर कर्जाची पूर्ण परतफेड बचत गट सदस्यांचे इतर उत्पन्नातून तसेच गहाणातील मालमत्ता विक्री करून वसुल करण्याचा अधिकार बॅंकेला राहील. अशा आशयाचा करारनामा गटाच्या संपूर्ण सदस्यांना बॅंकेला करून द्यावा लागेल.

११. या कर्जाकरिता बचत गटाला (बी.पी.एल. व नॉन बी.पी.एल.) बँकेचा व्याज दर १२.५० टक्के राहील. व बचत गटाचे सदस्यांना अंतर्गत कर्ज वाटपाकरिता आकारावयाच्या व्याज दराबाबतचा निर्णय त्या गटानेच घ्यावयाचा आहे. परंतु तो अवाजवी राहणार नाही याबाबत गटाने दक्षता बाळगणे आवश्यक राहील.

१२. सदर कर्जाची परतफेड ३ वर्षाचे आंत मासिक हप्त्यांत करावी लागेल. त्याकरिता वचन चिठ्ठी, करारनामा, अर्ज, कबुली पत्र, कन्टिन्युईंग गॅरंटी बाँड ही कागदपत्रे इतर आवश्यक कागदपत्रासोबत गटाला भरुन घ्यावी. लागतील. परतफेड कालावधी कर्ज रकमेवर अवलंबुन राहील.

१३. बचत गट व गटातील सर्व सदस्यांना कर्ज मंजुरीपूर्वी बँकेचे नाममात्र सभासद व्हावे लागेल. त्याकरिता आवश्यक फीस्चा भरणा बँकेच्या जवळच्या शाखेत करुन शाखा व्यवस्थापक यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत द्यावे लागेल. संपूर्ण कर्जप्रकरण बचत गटाचे खाते ज्या शाखेत आहे त्या शाखेत सादर करुन शाखा व्यवस्थापकाचे शिफारशीसह प्रकरण मंजुरीकरिता मुख्य कार्यालयास सादर करावे.

१४. बी.पी.एल. गटांना मिळणारे शासकीय अनुदान हे कर्ज करिता गटाची स्वगुंतवणूक म्हणून वापरता येईल. किंवा कर्जात वसुली पोटी जमा करता येईल. परंतु नॉन बी.पी.एल. गटांना कर्ज रकमेच्या २०% रक्कम स्वगुंतवणूक म्हणून बँकेत जमा करावी लागेल. दोन्ही प्रकारच्या गटांना कर्ज मंजुर करतांना कर्ज मंजुरीची रक्कम जास्तीत जास्त रुपये २.५० लाख पर्यंत राहील. त्याचप्रमाणे प्रकल्पापासून मिळणारे उत्पन्न व गटातील सदस्यांना मिळणाऱ्या कामाच्या मोबदला याची सांगड घालून गटांची व सदस्यांची परतफेड क्षमता विचारांत घेवुन कर्ज मर्यादा ठरविण्यात येईल.

१५. ज्या गटातील अंतर्गत कर्जव्यवहार व मासिक वर्गणी वसुली चे प्रमाण ८०% असेल. अशाच गटांना उद्योग सुरु करण्याकरिता कर्ज मंजुरीचा विचार होईल. गटाच्या संपूर्ण कर्ज व्यवहारावर वसुली अंतर्गत हिशोब इ. बाबींवर सख्त नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापक व निरिक्षक यांची संयुक्तरित्या राहील. गटाच्या आर्थिक सक्षमतेबाबत व इतर सर्व अनुषंगिक बाबींचा मासिक अहवाल शाखा व्यवस्थापकांनी मुख्य कार्यालयास सादर करावयाचा आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक ५(२):- बँकेच्या जरीपटका शाखेचे पाणी बील रुपये १७८६६।- भरणेकरिता मंजुरी बाबत.

ठराव क्रमांक ५(२):- मा.अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, जरीपटका शाखा ही किरायाचे इमारतीत असून तेथील पाण्याचे बील घरमालक व बँक यांच्यात झालेल्या कराराप्रमाणे बँकेने भरावयाचे आहे. शाखा सुरु झाल्यापासून दिनांक २१.८.२००० पर्यंतचे पाण्याचे बील घरमालकाने भरले आहे. परंतु दिनांक २२.८.२००० पासून पाण्याचे बील व्यापारी दराने आकारणी करुन आल्यामुळे घरमालकाने दिनांक २२.८.२००० ते १५.११.२००१ पर्यंतचे १६ महिने कालावधीचे रुपये १७८६६।- रकमेचे बील बँकेकडे भरणा करण्यास दिले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन जरीपटका शाखा इमारतीचे घरमालक व बँक यांचेत झालेल्या कराराप्रमाणे जरी-पटका शाखेचे पाणी बील बँकेने भरावे असे ठरले. सबब जरीपटका शाखेचे पाण्याचे दिनांक २१.८.२००० ते १५.११.२००१ पर्यंतच्या कालावधीकरिता आलेले रुपये १७८६६।-चे पाणी बील भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक ५(३):- हातमाग विणकर सहकारी संस्थांना सन २०००-०१ करिता मंजुर असलेल्या पत मर्यादांना मुदतवाढ देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(३):- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, हातमाग विणकर सहकारी संस्थांना पत मर्यादा मंजुरीनुसार कर्ज स्वरुपावर नियमित व्यवहार करता यावे म्हणून मंजुर असलेल्या पत मर्यादांचे नुतनीकरण मंजुर करणेसाठी कर्ज नुतनीकरण मागणी अर्ज सर्व निकषांची पुर्तता करुन आवश्यक कागदपत्रासह दिनांक १५ जानेवारी पर्यंत बँकेकडे सादर करणे अपेक्षित आहे. फार थोड्या हातमाग विणकर सहकारी संस्था कर्जमर्यादा नुतनी-करणाचे मागणी अर्ज बँकेकडे वेळेवर सादर करुन वेळीच नुतनी करण मंजुर करुन घेतात. सन २०००.२००१ या वर्षाकरिता २८ हातमाग सहकारी विणकर संस्थांना कर्जनुतनीकरण मंजुर

करण्यांत आले होते.चालु वर्षात ह्या २६६ संस्थांपैकी १९८ संस्थांचे कर्ज मर्यादा नुतनिकरण मंजुर झाले असून ७५ संस्था कर्ज नुतनीकरणाकरिता मंजुरीस पात्र आहेत. उर्वरित ६८ संस्थांपैकी ४७ संस्थांनी कर्जनुतनिकरण मंजुरीसाठी बँकेकडे अर्ज केले नाहीत. २९ संस्थांनी कर्जवरिल दिनांक ३१.३.२००१ पर्यंतचे संपूर्ण व्याजाच्या भरणा केला नाही. २९ संस्थांनी कर्जवरिल दिनांक ३१.३.२००१ पर्यंतचे संपूर्ण व्याजाच्या भरणा केला परंतु कर्जनुतनीकरण करिता आवश्यक निकषांची पूर्तता केली नाही. अशा ह्या सर्व ६८ संस्थांनी कर्जनुतनीकरणाकरिता निकषांची पूर्तता दिनांक ३१ मार्च २००२ चे आंत केली नाही तर ह्या ६८ संस्था ३१ मार्च २००२ ला थकित होतील.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कर्जनुतनीकरण मंजुरीकरिता निकषांची पूर्तता करणाऱ्या पात्र असलेल्या ७५ सहकारी संस्थांना कर्ज नुतनीकरण मंजुर करण्यांत यावे. ज्या संस्थांनी ३१ मार्च २००१ चे व्याजाच्या भरणा केलेला आहे परंतु आवश्यक निकषांची पूर्तता केली नाही अशा २९ सहकारी विणकर संस्थांना खास बाब म्हणून सन २००१-०२ करिता कर्जनुतनीकरण मंजुर करण्यांत यावे तसेच कर्जवरिल दिनांक ३१ मार्च २००१ पर्यंतचे व्याजाच्या भरणा दिनांक ३१ मार्च २००२ चे आंत करणाऱ्या संस्थांना सुद्धा कर्जनुतनीकरण मंजुर करण्यात यावे असे ठरले. तसेच थकित असलेल्या संस्थांनी कर्जनुतनीकरणाची मागणी केल्यास त्यांचेकडील अद्यावत व्याजाच्या भरणा करून घेऊन अशा संस्थांचे कर्ज नुतनीकरण करावयाचे झाल्यास पूर्वी मंजुर असलेल्या मर्यादेच्या ७५% रकमेपर्यंतच्या कर्जमर्यादेचे पुढील वर्षा करिता नुतनीकरण करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्रमांक ५(४) :- बँकेतील कर्मचाऱ्यांसाठी ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करतांना काढावयाच्या सुत्रांत कायद्यातील सुधारणेनुसार बदल अमलांत आणणेबाबत.

ठराव क्रमांक ५(४) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपदान अधिनियम १९७२ च्या नियमास अधिन राहून उपदानाची रक्कम अदा करण्यांत येत आहे. याकरिता दिनांक २७.७.१९९२ ला संचालक मंडळाचे सभेत माहिती देऊन ठराव करण्यांत आलेला आहे. उपदान अधिनियम १९७२ नुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास

सेवानिवृत्त होतेवेळी त्यांचे सर्व्हिस कालातील शेवटच्या महिन्याचा मुळ पगार व महागाई भत्ता विचारांत घेऊन ग्रॅज्युईटी काढण्याचे नियमांत सुधारणा होण्यापूर्वीचे सुत्र खालीलप्रमाणे आहे.

शेवटचा पगार (मुळपगार + महागाई भत्ता) / 30 दिवस × नोकरीचा कालावधी × १५ दिवस

परंतु १९८८ साठी ग्रॅज्युईटीची रक्कम निश्चित करण्याचे नियमांत सुधारणा झाली असल्याचे नाबार्ड तपासणी अधिकारी यांनी निदर्शनास आणून दिले. ग्रॅज्युईटीची रक्कम निश्चितीकरिता महिन्याचे तीस दिवस ऐवजी २६ दिवस गृहीत धरण्यांत यावे असा बदल झाला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेतील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे उपदान अधिनियम १९७२ मधील नियमांत झालेल्या बदलानुसार उपदानाची रक्कम निश्चित करणेकरिता कार्यवाही करणेत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक ५(५) :- सन २००२-२००३ सालाकरिता अल्पमुदत शेतीकर्ज मर्यादा रूपये ३५.०० कोटी मंजुर करणेकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे प्रस्ताव सादर करणे.

ठराव क्रमांक ५(५) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगीतले की, मागील वर्षी रूपये २२.०० कोटी अल्पमुदत शेतीकर्ज मर्यादा मंजुर झाली होती. आणि त्यावर रूपये २२.०० कोटी उचल केली होती. चालू वर्षात खत, बियाणे, औषधी यांचे भाव विचारांत घेता रूपये ६०.०० कोटीपर्यंत लघुकर्ज वाटप होईल असा अंदाज आहे त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रूपये ३५.०० कोटी अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा मंजुर करण्याकरिता ठराव करून प्रस्ताव पाठवावा लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रूपये ३५.०० कोटी अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा मंजुर करण्या करिता खालीलप्रमाणे ठराव करून प्रस्ताव पाठविण्यांत यावा असे ठरले.

- RESOLUTION -

Resolved to borrow during the year 2002-2003

an amount of Rs. 3500.00 Lakhs (Rupees Thirty five hundred lakhs) from the Maharashtra State Cooperative Bank Ltd., and to request the State Cooperative Bank to apply for a credit limit for a like sum to the National Bank for Agriculture and Rural Development under section 21(1)(i) read with section 21(3)(a) or 21(3)(b) of the NABARD Act 1981 for financing seasonal Agriculture operations as under.

| | | |
|---|---|---|
| (i) | For financing OPP ----- | Rs. 200.00 lakhs |
| (ii) | For financing NPDP ----- | Rs. ------- |
| (iii) | For financing under DTP. ... | Rs. 20.00 Lakhs |
| (iv) | For financing other crops. ... | Rs. 3280.00 Lakhs |
| | Total | Rs. 3500.00 lakhs. |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५(६) :- महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ अंतर्गत बँकेच्या अधिकाऱ्यांना वसुलीचे अधिकार प्रदान करण्याबाबत मा० विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ५(६) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेला संलग्न असलेल्या बलुतेदार सहकारी संस्थांकडे बँकेची कर्जबाकी थकित आहे. ही थकित थकित कर्जबाकी वसुल करणे पुढील कर्ज व्यवहारासाठी आवश्यक आहे. याकरिता बँकेचे बलुतेदार संस्थांचे निरिक्षक श्री एस.एस. मानकर "ब" वर्ग अधिकारी यांना संस्थेच्या कारागिराकडील थकित कर्ज बाकी सक्तीने वसुल करणेसाठी विशेष वसुली अधिकारी म्हणून तसेच शेती व बिगरशेती कर्ज वसुल करणेसाठी श्री सी.एम. कांबळे, निरिक्षक शाखा वडोदा यांना विशेष वसुली अधिकारी म्हणून मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे दिनांक २९ मार्च २०००चे पत्राप्रमाणे अधिकार मिळणेसाठी मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावयाची आहे. श्री एस. एस. मानकर, निरिक्षक, बलुतेदार सहकारी संस्था ह्यांचे मुख्यालय बँकेचे मुख्य कार्यालय, नागपूर राहणार असून कार्यक्षेत्र संपूर्ण नागपूर जिल्हा राहील. तसेच श्री सी.एम. कांबळे, निरिक्षक शाखा वडोदा ह्यांचे मुख्यालय शाखा वडोदा राहणार

असून कार्यक्षेत्र संपूर्ण नागपूर जिल्हा राहील. श्री. एस. एस. मानकर व श्री. सी. एम. कांबळे यांना महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६(१) व १५६(२) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे कलम २(एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील उपनियम (३)(५)(६)(७)(९) (१०)(११) (अपसेट प्राईस कायम करण्याची तरतुद वगळून) (१२)(१३), (१५)(१७)(१८) व (२०) तसेच कलम १०१ व १३७ नुसार अधिकार प्रदान होणेस्तव मा. विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यात यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक ५(७):- सन २००१-२००२ आर्थिक वर्षाकरिता नॉन फार्म सेक्टर अंतर्गत बँक कर्ज वाटपापोटी फेर कर्ज मर्यादा मंजुरी व त्यापोटी उचल मिळणेबाबत राज्य / राष्ट्रीय बँकेस विनंती करणे.

ठराव क्रमांक ५(७):- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात नॉन फार्म सेक्टर अंतर्गत खालील कर्ज कारणाकरिता एकुण रुपये ७४.०१ लाखाचे कर्जवाटप करण्यांत आले आहे.

| अ.क्र. | कर्जाचे कारण | कर्ज वाटप रक्कम रुपये | फेर कर्ज मर्यादा मंजुरी व उचल ९०% |
|---|---|---|---|
| १. | डोमेस्टीक गॅस कनेक्शन | ७.४० लाख | ६.६६ लाख |
| २. | रोड ट्रान्सपोर्ट | ३४.३४ लाख | ३०.९१ लाख |
| ३. | वैयक्तीक व्यावसायीकांना वाहन कर्ज | १८.७० लाख | १६.८३ लाख |
| ४. | बलुतेदार कर्जवाटप | ११.३७ लाख | १०.२३ लाख |
| ५. | स्वयं सहाय्यता बचत गट | २.२० लाख | १.९८ लाख |
| | एकुण | ७४.०१ लाख | ६६.६१ लाख |

सदर कर्ज कारणा अंतर्गत कर्ज वाटपापोटी राज्य बँकेकडे कमी व्याजदराच्या फेरकर्ज पतपुरवठा उपलब्ध आहे. व या फेर

कर्जाची उचल घ्यावयाची अंतिम तारीख ३१ मार्च २००२ आहे. विषयावर सविस्तर चर्चा होवुन नॉन फार्म सेक्टर अंतर्गत उपरोक्त कर्ज कारणापोटी एकुण कर्ज वाटप रुपये ७४.०७ लाखांचे ९०% दराने रुपये ६६.६७ लाख फेरकर्ज मर्यादेस मंजुरी देणे व त्यापोटी जिल्हा बँकेस उचल देणे संदर्भात फेरकर्ज प्रस्ताव सादर करुन विनंती करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

मुख्यव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि; नागपूर.

मा॰ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था म.रा.पुणे यांचे पत्र क्रमांक एक/आयएन/एनडीसीसी बँक/२००२ दिनांक ३.५.२००२ अन्वये बँकेचे सध्याचे संचालक मंडळ बरखास्त होउन माननीय प्रशासकांची बँकेवर नियुक्ती झाली आहे.

# प्रशासकीय राज

दिनांक ०३ मे २००२ पासून

3/5/2002
पत्रक
प्रशासकीय
निर्णय/ठराव



## प्रशासकीय निर्णय शुक्रवार दिनांक ३/५/२००२.

विषय क्रमांक १ :- बँकेच्या चालु ठेव खात्यावर व्यवहार करण्यास अधिकार देणे.

निर्णय क्रमांक १ :- विषयाचे अनुषंगाने माहिती देतांना सरव्यवस्थापक यांनी सांगितले की, मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक - एफआयएन/एनडीसीसी बँक/२००२ दिनांक ३.५.२००२ अन्वये दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि; नागपूरचे सध्याचे संचालक मंडळ बरखास्त करून श्री. एस. बी. पाटील जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना संचालक मंडळाचे जागेवर बँकेचा कारभार पाहणेकरिता प्रशासक म्हणून नेमणूक केली आहे त्याप्रमाणे श्री. एस. बी. पाटील, जील्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी शुक्रवार दिनांक ३.५.२००२ रोजी दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि; नागपूर या बँकेचे प्रशासक म्हणून कार्यभार घेतला आहे.

बँकेचे प्रशासक म्हणून श्री. एस. बी. पाटील यांनी कार्यभार संभाळल्या मुळे बँकेचे रिझर्व बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट कोऑप. बँक लि; आणि स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकामध्ये चालु ठेव खाते असून या खात्यावर उपविधी कलम ६८ नुसार व्यवहार करण्यास खालीलप्रमाणे इंग्रजीतील ठराव पाठविण्यांत यावा. असा निर्णय झाला.

### - RESOLUTION -

Resolved that the following officers in Head Office are authorised to sign cheques, Demand Drafts and Hundies, Issue Deposit receipts, Endorse Bills of Exchange and Bank Post Bills and sign receipts on behalf of the bank, jointly any two from Group 'A' or anyone from group 'A' and one from Group 'B' as given below :-

1) Administrator
2) General Manager
3) Manager
4) Chief Accountant
5) Chief Officer
} Group 'A'

6) All Accountants in Head office - Group 'B'

Board of Directors
Superceded by
Resolution dt/-
3/5/02

Further resolved that in case of Branches any two of the following are jointly authorised to sign cheques, drafts, Hundies, Deposit receipts and to endorse bill of Exchange, bank post bills and sign receipts on behalf of the bank.

1) Branch Manager
2) Accountant
3) Accounts clerk
4) Cashier.

Further also resolved that Administrator empowered to delegate the powers by name as stated above.

---

सरव्यवस्थापक

प्रशासक 3/5/2002.

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को ऑपरेटीव्ह बँक लि; नागपूर.

(2)

## - प्रशासकीय निर्णय -

### सोमवार दिनांक ०६/०५/२००२

विषय क्रमांक १ :- बँकेच्या चालु ठेव खात्यावर व्यवहार करण्यास अधिकार देणे.

ठराव क्रमांक १ :- विषयाच्या अनुषंगाने माहिती देतांना प्रभारी व्यवस्थापक यांनी सांगितले की, मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक - एफआयएन/एनडीसीसी बँक/२००२ दिनांक ६.५.२००२ अन्वये श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचे जागी श्री. एल. बी. पाटील, कार्यकारी संचालक, निर्मल अर्बन कोऑपरेटीव बँक लि; नागपूर यांची दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव बँक लि; नागपूरचे प्रशासक म्हणून नेमणुक झाली आहे. त्याप्रमाणे श्री. एल. बी. पाटील, कार्यकारी संचालक निर्मल अर्बन कोऑपरेटीव बँक लि; नागपूर यांनी सोमवार दिनांक ६.५.२००२ रोजी दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव बँक लि; नागपूर या बँकेचे प्रशासक म्हणून पदभार स्विकारला आहे.

बँकेचे प्रशासक म्हणून श्री. एल. बी. पाटील यांनी पदभार स्विकारल्यामुळे बँकेचे रिझर्व बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटीव बँक लि; आणि स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकांमध्ये चालु ठेव खाते असून या खात्यावर उपविधी कलम ६४ नुसार व्यवहार करण्यास खालील प्रमाणे इंग्रजीतील ठराव पाठविण्यात यावा. असा निर्णय झाला.

### - RESOLUTION -

Resolved that following officers in Head office are authorised to sign cheques, Demand Drafts and Hundies, Issue Deposit Receipts, Endorse Bills of Exchange and Bank Post Bills and sign receipts on behalf of the Bank jointly any two from Group 'A' or any one from Group 'A' and one from 'B' as given below:-

1) Administrator
2) Manager
3) Chief Officer
4) Chief Accountant

} — Group 'A'

5) All Accountants in Head office — Group 'B'

Further resolved that in case of Branches any two of the following are jointly authorised to sign.

cheques, Drafts, Hundies, Deposit receipts and to Endorse bill of Exchange, Bank post Bills and sign receipts on behalf of the Bank.

1. Branch Manager
2. Accountant
3. Account clerk
4. Cashier.

Further also resolved that Administrator be empowered to delegate the powers by name as stated above.

---

विषय क्रमांक २:- पगारदार सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून फेरकर्ज मर्यादा मंजुरीबाबत व उचल देणेबाबत विनंती करणे.

ठराव क्रमांक २:- विषयाचे अनुषंगाने मा० प्रभारी व्यवस्थापक यांनी माहिती दिली की, बँकेने पगारदार सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्जापोटी दिनांक ३१.३.२००२ ला रूपये २८.४८ कोटी कर्ज बाकी आहे. बँकेला कृषि हंगामात शेतकऱ्यांना पिक कर्जवाटपासाठी आवश्यक निधी बँकेवर उपलब्ध व्हावा म्हणून बँकेने पत्र क्रमांक-कर्ज विभाग/फेर कर्ज उचल/२००२-०३/६०४ दिनांक ३०.४-२००२ नुसार राज्य सहकारी बँकेकडे पगारदार संस्थांना केलेल्या पतपुरवठ्यापोटी रूपये २१.९८ कोटी फेरकर्ज मंजुरीबाबत विनंती केली आहे. सदर फेरकर्ज मागणी व कर्ज उचल प्रकरणासोबत बँकेचे मा० संचालक मंडळाच्या फेरकर्ज मागणीबाबतच्या ठराव पुढील सभेत पारित करून घेवुन सादर करण्याची हमी बँकेचे वतीने दिली होती. परंतु त्यानंतरचे काळांत बँकेचे संचालक मंडळ बरखास्त होवुन मा० प्रशासकाची नियुक्ती झाली असल्याने बँकेचे वतीने प्रशासकीय ठराव घेवुन पाठवावा लागेल.

- प्रशासकीय ठराव -

बँकेचे पगारदार सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्जापोटी दिनांक ३१.३.२००२ ला रूपये २८.४८ कोटी कर्जबाकी असल्याने त्यापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे रूपये २१.९८ कोटी फेरकर्ज मंजुरी बाबत व मंजुर कर्ज मर्यादेवर उचल देणे बाबत या ठरावाद्वारे

विनंती करण्यांत येत आहे. राज्य सहकारी बँकेने घातलेल्या कर्ज मंजुरीच्या अटी व शर्ती बँकेला मंजुर राहतील.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

विषय क्रमांक ३ :- सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिलेल्या पिक कर्जापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून फेर कर्ज मर्यादा मंजुरी बाबत व उचल देणेबाबत विनंती करणे.

(लोकपाल मोडली) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून आपल्या बँकेत अल्पमुदत शेती ⊗

ठराव क्रमांक ३ :- विषयाचे अनुषंगाने मा० प्रभारी व्यवस्थापक यांनी माहिती दिली की, बँकेनी सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्जपोटी (वाढ्या) दिनांक २६.८.२००२ (ला) रुपये ९.०० कोटी करण्यांत कर्जवाटप करण्यांत आहे. बँकेला कृषि हंगामात शेतकऱ्यांना पिक कर्जवाटपासाठी आवश्यक निधी वेळेवर उपलब्ध व्हावा म्हणून बँकेने पत्र क्रमांक - कर्ज विभाग/फेरकर्ज उचल/२००२-०३/ ५९९ दिनांक २९.८.२००२ नुसार राज्य सहकारी बँकेकडे सेवा/विविध कार्यकारी संस्थांना केलेल्या कर्जवाटपापोटी रुपये ९.०० कोटी फेरकर्ज मंजुरी बाबत विनंती केली आहे. सदर फेर कर्ज मागणी व कर्ज उचल प्रकरणासोबत बँकेचे मा० संचालक मंडळाच्या फेरकर्ज मागणी बाबतचा ठराव पुढील सभेत पारीत करुन घेऊन सादर करण्याची हमी बँकेचे वतीने दिली होती. परंतु त्यानंतरचे कालावधीत बँकेचे संचालक मंडळ बरखास्त होऊन मा० प्रशासकांची नियुक्ती झालेली असल्याने बँकेचे वतीने प्रशासकीय ठराव घेऊन पाठवावा लागेल. (लोकपाल मोडली)

(लोकपाल मोडली)
⊗ फेरकर्ज मर्यादा रुपये २२००.०० लाख वर्ष २००१-२००२ करिता दिनांक ३०.६.२००२ चे मुदतीने मंजुर आहे.
⊗ पर्यंत रुपये ९१५.०९ लाखाचे अल्पमुदती शेती कर्ज वितरण केले आहे. त्यापोटी राज्य सहकारी बँकेकडून फेरकर्ज उचल घेण्याकरिता
(लोकपाल मोडली)

- प्रशासकीय ठराव -

"बँकेनी सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्जपोटी दिनांक २६.८.२००२ पर्यंत रुपये ९१५.०९ लाखाचे (लोकपाल मोडली) ९.०० कोटी प्रत्यक्ष कर्जवाटप केले असल्याने त्यापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे रुपये ९.०० कोटी फेरकर्ज मंजुरीबाबत व मंजुर कर्ज मर्यादेवर उचल देणेबाबत या ठरावाद्वारे विनंती करण्यांत येत आहे ⊗ राज्य सहकारी बँकेने घातलेल्या कर्ज मंजुरीच्या अटी व शर्ती बँकेला मंजुर राहतील." मान्य आहे."

(लोकपाल मोडली)
⊗ तसेच राज्य सहकारी बँकेकडून मंजुर मर्यादा रुपये २२००.०० लाखाच्या फेरकर्ज मर्यादेवर उचली घेणे संदर्भीय कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार मा. प्रशासक व प्रभारी व्यवस्थापक यांना संयुक्त रित्या देण्यात येत आहे.
(लोकपाल मोडली)

(लोकपाल मोडली)

प्रशासकीय ठराव मंजुर

---

विषय क्रमांक ४ :- नागरी सहकारी बँकांना दिलेल्या कर्जापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून फेर कर्ज मंजुरीबाबत

ठराव क्रमांक ४ :- विषयाचे अनुषंगाने मा० प्रभारी व्यवस्थापक यांनी माहिती दिली की, बँकेने नागरी सहकारी बँकांना मंजुर केलेल्या रुपये १०.०० कोटी

कर्ज मर्यादेपोटी दिनांक ३१.३.२००२ अखेर व्याजासह रुपये १०२७.८६ लाख कर्ज बाकी आहे. बँकेला कृषि हंगामासाठी निधी आवश्यक असल्याने बँकेने पत्र क्रमांक - कर्ज विभाग/फेर कर्ज/2002-03/६९६ दिनांक ३०.८.२००२ नुसार राज्य सहकारी बँकेकडे नागरी सहकारी बँकांना केलेल्या पतपुरवठ्या पोटी रुपये ८००.०० लाख फेर कर्ज मर्यादा मंजुरीची विनंती केली आहे. फेरकर्ज मर्यादा व कर्ज उचल प्रकरणासोबत बँकेचे मा० संचालक मंडळाच्या फेरकर्ज मागणी बाबतच्या ठराव पुढील सभेत पारीत करुन घेवुन सादर करण्याची हमी बँकेचे वतीने दिली होती. परंतु त्यानंतरचे काळांत बँकेचे संचालक मंडळ बरखास्त होवुन मा० प्रशासकांची नियुक्ती झालेली असल्याने बँकेचे वतीने प्रशासकीय ठराव पाठवावा लागेल.

- प्रशासकीय ठराव -

"बँकेने नागरी सहकारी बँकांना मंजुर केलेल्या रुपये १०.०० कोटी कर्जमर्यादेपोटी दिनांक 30.8.2002 ला रुपये १०.०० कोटी कर्ज बाकी असल्याने त्यापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे रुपये ८.०० कोटी फेरकर्ज मंजुरीबाबत व मंजुर कर्ज मर्यादेवर कर्ज उचल देणेबाबत या ठरावान्वये विनंती करण्यांत येत आहे. राज्य सहकारी बँकेने घातलेल्या कर्ज मंजुरीच्या अटी व शर्ती बँकेला मंजुर राहतील."

प्रशासकीय ठराव मंजुर

प्रभारी व्यवस्थापक | प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि; नागपूर.

(७)

## प्रशासकीय ठराव दिनांक १६-०५-२००२

विषय क्र.१- बँकेला रुपये १५०.०० कोटी विशेष आर्थिक मदत (क्रेडीट पॅकेज) मंजुरी करिता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पूणे यांचेकडे विनंती अर्ज पाठविणेबाबत.

निर्णय क्र.१ :- बँकेचे प्रभारी व्यवस्थापक यांनी सांगितले की, शासकीय रोख्यांमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे बँकेचा निधी रोखे गुंतवणुकीत अडकून पडलेला आहे. शासकीय रोखे गुंतवणुकीत बँकेचा निधी अडकून पडल्यामुळे वर्तमान पत्रातून येणाऱ्या बातम्या वाचुन बँकेचे ठेवीदार आपल्या ठेवी बँकेतून काढून नेत आहेत. ठेवीदारांच्या मागणीप्रमाणे बँक रक्कम उपलब्ध करून देत आहे परंतु ठेवीदारांना त्यांचे मागणीप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, रिझर्व बँक यांच्याकडून पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने तसेच अर्बन सहकारी बँका आपल्या बँकेत त्यांचेकडील निधी गुंतवीत नसल्यामुळे अडचणीची परिस्थिती निर्माण झाली आहे. पिक कर्जवाटपांत निधी अभावी व्यत्यय निर्माण झालेला आहे. निर्माण झालेल्या सध्याचे परिस्थितीत सुधारणा करणेसाठी बँकेला पुर्ववत स्थिती निर्माण व्हावी म्हणून क्रेडीट पॅकेज तयार करण्यांत यावे असे वाटले. गुजरांत राज्यातील माधवपूरा अर्बन सहकारी बँक लि; अहमदाबाद या बँकेला पुर्वस्थितीत आणण्यासाठी केंद्र सरकारने विशेष आर्थिक मदत दिली. त्याप्रमाणे आपल्या बँकेला केंद्र सरकारकडून रुपये ५०.०० कोटी (अक्षरी रुपये पन्नास कोटी) पांच वर्ष कालावधीकरिता विशेष आर्थिक मदत मिळावी. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या; मुंबई यांचेकडून रुपये १००.०० कोटी (अक्षरी रुपये शंभर कोटी) पांच वर्ष मुदतीची विशेष आर्थिक मदत मिळावी. याप्रमाणे विशेष आर्थिक मदतीवरील बँक रेट ६½% पेक्षा जास्त येणाऱ्या व्याजाचा बोझा महाराष्ट्र राज्य सरकार यांचेकडून मिळावा. याकरिता खालील प्रमाणे प्रशासकीय ठराव घेउन मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेकडे प्रकरण शिफारशीसाठी व मंजुरीचे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत यावे असा निर्णय झाला.

### — प्रशासकीय ठराव —

"बँकेने शासकीय रोख्यांमध्ये गुंतवणुक केलेला निधी अडकून पडल्यामुळे तसेच या संदर्भात वर्तमान पत्रातील प्रसिध्दीमुळे

ठेवीदार ठेवी काढून घेत असल्यामुळे बँकेच्या ठेवी सारख्या कमी होत आहेत व त्यामुळे पिक कर्ज वाटपांत निधी अभावी व्यत्यय येत असल्याने त्यावर उपाय म्हणून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यांत येत आहे.

अ) गुजरांत राज्यातील माधवपुरा अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेला यापूर्वी केंद्र सरकारने केलेल्या मदतीचे धर्तीवर आपल्या बँकेला सुध्दा भारत सरकारकडून पांच वर्षांचे कालावधी करिता रूपये ५०.०० कोटी "विशेष अर्थ सहाय्य" मागणीकरिता विनंती करण्यांत यावी.

ब) त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि; मुंबई यांचेकडून विशेष निधी म्हणून रूपये १००.०० कोटी रक्कम "वेज ॲंड मिन्स" (सॉफ्ट लोन) म्हणून ६.५०% व्याज दराने पांच वर्षे मुदतीकरिता अर्थ सहाय्य मंजुर करण्यासाठी विनंती करणे यावी.

क) वरीलप्रमाणे मिळणारे अर्थ सहाय्याकरिता व्याजदर ६½% असावा अथवा यापेक्षा जास्त व्याजदर असल्यास या व्याजदरापेक्षा जास्तीचे व्याजदराकरिता महाराष्ट्र शासनाने त्याचे विशेष व्याज अनुदान मंजुर करून बँकेला मदत करण्याबाबत महाराष्ट्र शासनाला विनंती करावी.

वरीलप्रमाणे भारत सरकारकडून रूपये ५०.०० कोटी तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रूपये १००.०० कोटी विशेष अर्थसहाय्य मिळण्यासाठी त्याचप्रमाणे या कर्जावरील व्याज करिता महाराष्ट्र शासनाकडून व्याज अनुदान मंजुर करण्याकरि-ता मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेकडे सादर करावा असा प्रशासकीय ठराव करण्यांत आला.

सदर प्रकरणावर व संबंधीत कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार श्री. एल. बी. पाटील, प्रशासक व श्री. एस. एस. गोडे, प्रभारी व्यवस्थापक यांना संयुक्त रित्या देण्यांत येत आहेत.

प्रशासकीय ठराव मंजुर

[signature] प्रभारी व्यवस्थापक

[signature] प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि; नागपूर.

(१)

## प्रशासकीय ठराव

दिनांक १७.०५.२००२

विषय क्रमांक १ :- वैयक्तीक व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत कर्जवाटप केलेल्या व्यवसायातील उद्योजकाकडून थकबाकी रकमेची कर्जवसुली होणेसाठी सहकार न्यायालयांत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक १ :- वैयक्तीक व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत श्री सहादेव राघोबाजी गोल्हर, रा. पिपरा, तह. उमरेड यांना कृषि सेवा केंद्राचे व्यवसायाकरिता कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा रुपये १.०० लाख दिनांक ३०.६.२००० पर्यंतचे मुदतीकरिता मंजुर केलेली होती. कर्जदाराचे कर्जखात्यावरील व्यवहार नियमित नसल्याने कर्जदारास वेळोवेळी सुचना तसेच प्रत्यक्षांत भेट घेऊन थकित कर्ज रक्कम बँकेत भरण्यास सांगितले. परंतु त्याबाबत कोणतीही दखल न घेता कर्जदाराने मुद्दलाची रक्कम भरलेली नाही. कर्जदाराकडे ३१ मार्च २००२ ला कॅश क्रेडीट कर्जबाकी रुपये ९७५९७/- थकित आहे. कर्जदारास कर्ज खात्यावरील व्यवहार नियमित व सुरळीत करण्याबाबत, कर्जाची परतफेड करण्याबद्दल कळवून देखील कर्जदार दखल घेत नाही. त्यामुळे त्यांचेकडील संपूर्ण कर्जाची वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ प्रमाणे कायदेशिर कारवाई करावी लागेल.

"प्रशासकीय ठराव"

श्री सहादेव राघोबाजी गोल्हर ह्यांना वैयक्तीक व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत कृषि सेवा केंद्राचे व्यवसायासाठी रुपये १.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा दिनांक ३०.६.२००० पर्यंतचे मुदतीसाठी मंजूर होती. कर्जदाराचे कर्जखात्यावरील व्यवहार सुरुवातीपासून असमाधानकारक आहेत. त्यांनी मंजुर मर्यादेचे नुतनीकरण करून घेतले नाही. व कर्ज परतफेड सुध्दा केली नाही. दिनांक ३१ मार्च २००२ रोजी त्यांचेकडे कॅश क्रेडीट कर्ज रुपये ९७५९७/- थकित आहे. श्री सहादेव राघोबाजी गोल्हर यांना वेळोवेळी सुचना देऊन सुध्दा तसेच प्रत्यक्षांत भेट घेऊन कर्ज परतफेड करण्यास सांगितले असतांना सुध्दा कर्जदार कर्जाची परतफेड करीत नसल्यामुळे व कर्ज थकित झाल्याने त्यांचेकडील संपूर्ण कर्जाची वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम ९१ अंतर्गत सहकारी न्यायालयांत दावा दाखल करण्याबाबत प्रशासकीय निर्णय घेण्यात आला.

प्रशासकीय ठराव मंजूर

विषय क्रमांक २:- वैयक्तीक व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत कर्ज वाटप केलेल्या व्यवसायातील उद्योजकाकडून थकबाकी रकमेची कर्जवसुली होणेसाठी सहकार न्यायालयांत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक २:- वैयक्तिक व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत कर्ज वाटप केलेल्या श्री राजेश्वर रामभाऊ देशमुख राहणार उमरेड यांना उमरेडचे मार्केट यार्डमध्ये अडत व दलालीचे व्यवसायासाठी क्लिन कॅश क्रेडीट मर्यादा रुपये २.०० लाख दिनांक ३१.५.२००१ पर्यंतचे मुदतीसाठी मंजुर केलेली होती. कर्जदारास अद्यावत व्याजाचा भरणा करुन आर्थिक पत्रके सादर करुन नुतनीकरण करण्यास कळविले होते. परंतु कर्जदाराने नुतनीकरण अर्ज सादर न केल्यामुळे कर्जाचे नुतनीकरण होऊ शकले नाही.

कर्जदारास प्रत्यक्ष मुलाखतीकरिता बोलाविले असतांना उपस्थित झाले नाही. कर्जदारास वेळोवेळी प्रत्यक्ष भेटून सुचना देवुन थकित रक्कम बँकेत भरण्यास सांगितले. परंतु कर्जदाराने मुद्दल व व्याजाची रक्कम कर्जखात्यांत जमा केली नाही. कर्जदाराकडे ३१ मार्च २००२ ला कॅश क्रेडीट कर्जबाकी रुपये २६९११५/- थकित आहे. कर्जदारास कर्जखात्यावरील व्यवहार नियमित व सुरळीत करण्याबाबत कर्जाची परतफेड करण्याबद्दल कळवून देखील कर्जदार दखल घेत नाही. त्यामुळे त्यांचेकडील संपूर्ण कर्जाची वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ प्रमाणे कायदेशिर कारवाई करावी लागेल.

- प्रशासकीय ठराव -

श्री राजेश्वर रामभाऊ देशमुख रा. उमरेड यांना उमरेडचे मार्केट यार्डमध्ये अडत व दलालीचे व्यवसायासाठी रु.२.०० लाख क्लिन कॅश क्रेडीट मर्यादा दिनांक ३१.५.२००१ पर्यंतचे मुदतीसाठी मंजुर होती. कर्जदाराचे कर्जखात्यावरील व्यवहार सुरुवातीपासूनच असमाधानकारक आहेत. यांनी मंजुर मर्यादेचे नुतनीकरण करुन घेतलेले नाही. व कर्ज परतफेड सुध्दा केलेली नाही. दिनांक ३१ मार्च २००२ रोजी यांचेकडे कॅश क्रेडीट कर्ज रु.२६९११५/- थकित आहे. श्री राजेश्वर रामभाऊ देशमुख यांना वेळोवेळी सुचना देवुन सुध्दा तसेच प्रत्यक्षांत भेट घेवुन कर्ज परतफेड

करण्यास सांगितले असतांना कर्जाची परतफेड करीत नसल्यामुळे व कर्ज थकित झाल्याने संस्थेकडील संपूर्ण कर्जाची वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० कलम ९१ अंतर्गत सहकारी न्यायालयांत दावा दाखल करण्याबाबत प्रशासकीय निर्णय घेण्यांत आला."

प्रशासकीय ठराव मंजूर

---

प्रभारी व्यवस्थापक	प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि; नागपूर.

(5)

## प्रशासकिय ठराव, दिनांक २०।५।२००२

विषय क्रमांक १ :- शेतकी संस्थांना त्यांचे सभासद व्याज गाळा रकमेतून (३टक्के मार्जिन) जाईंट फंड भरण्याकरिता रक्कम वळती करण्याबाबत.

निर्णय क्रमांक १ :- वरील विषयानुषंगाने माहिती देतांना सांगितले की, दि नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन को-ऑप. सोसायटी लि; नागपूरच्या संस्थेने दिनांक १।४।२००० ते ३१।३।२००१ या कालावधीत ३५६ सेवा सहकारी संस्था सभासदाकडून वसुल झालेल्या व्याज रकमेपैकी ३टक्के गाळ्याची रक्कम जॉइंट फंड देण्याकरिता प्रकरण सादर केले आहे. सदर ३५६ सेवा सोसायटीचे सभासदाकडून वसुल झालेले व्याज रकमेतून ३टक्के मार्जिन (गाळा) रक्कम रुपये १५२६१३६०/- येते. ६६सेवा सहकारी संस्थांनी सभासदाकडील आलेल्या वसुलीपैकी रु.६०७५५४/- रक्कम बँकेत भरणा केलेली नाही. म्हणून वसुली बँकेत न भरलेली रक्कम कमी करून रुपये १३४७७६००/- रक्कम जॉईंट फंड भरण्याकरिता वळती करावी म्हणून सदर प्रकरणानुसार शिफारस केली आहे. नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन को-ऑप. सोसायटीचे खात्याला पुरेशी रक्कम नसल्यामुळे जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा माहे एप्रिल २००२ चा पगार अद्याप होउ शकला नाही. तरी संस्थेला सदर प्रकरणाप्रमाणे ३टक्के गाळा रक्कम उपलब्ध करून देण्याबद्दल दिनांक २०.५.२००२ चे पत्राप्रमाणे विनंती केली आहे. सदर विनंती अर्जाप्रमाणे संस्थेतील कर्मचाऱ्यांचे माहे एप्रील २००२-चा पगार देण्यास रक्कम रुपये १३.५० लाख उपलब्ध करून देण्याकरिता खालीलप्रमाणे प्रशासकीय ठराव घेण्यांत आला.

-: प्रशासकीय ठराव :-

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन को.ऑप. सोसायटी मर्या; नागपूर या संस्थेने सन २०००-२००१ या सालातील सेवा सहकारी संस्थेच्या सभासदाकडून वसुल झालेल्या वसुलीपैकी व्याज रकमेतून ३ टक्के गाळा जॉईंट फंडात वळती करण्यास मागणी करून संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा एप्रिल २००२ चा पगार अद्याप निधी अभावी होवू शकला नाही असे दर्शवून त्यांनी रूपये १३.५० लाख रक्कम पगारासाठी व इतर खर्चासाठी आवश्यकता दर्शविली आहे. आजची बँकेची परिस्थिती आर्थिक सहाय्य करण्या सारखी नसली तरी बँकेला आजच्या परिस्थितीत

कर्जविमुळी व पिक कर्जाचे कर्जवाटप करणे अत्यंत गरजेचे असल्याने दि नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप. सोसायटीचे कर्मचाऱ्यांना पगारासाठी व संस्थेचे इतर खर्चासाठी रूपये १३.५० लाख त्यांचे जॉईंड फंड खात्याला वळती करण्यांत यावी. असा प्रशासकीय निर्णय घेण्यांत आला.

प्रशासकीय ठराव मंजुर

प्रभारी व्यवस्थापक | प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बँक लि. नागपूर.

(६)

## प्रशासकीय ठराव दिनांक २४।५।२००२

विषय क्रमांक१ :- सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून फेरकर्ज मर्यादा मंजुरी बाबत व उचल देणेबाबत विनंती करणे.

ठराव क्रमांक१:- राज्य सहकारी बँकेकडून आपल्या बँकेस अल्पमुदत शेती फेरकर्ज मर्यादा रुपये २२००.०० लाख वर्ष २००१-२००२ (दिनांक 30.६.2002 पर्यंत) करिता मंजुर आहे. बँकेनी सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्ज वाटपापोटी दिनांक २०.५.२००२ पर्यंत रुपये १४४८.४८ लाखाचे वाटप केलेले आहे. या वाटपापैकी राज्य बँकेकडून दिनांक २२.५.२००२ ला रुपये ८००.०० लाखाच्या कर्जाची फेरउचल केलेली आहे. उर्वरित फेरकर्ज उचलीकरिता (रुपये ६००.०० लाखाच्या) प्रशासकीय ठराव घेऊन पाठवावा लागेल.

### प्रशासकीय ठराव.

बँकेनी सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्जापोटी दिनांक २०.५.२००२ पर्यंत रुपये १४४८.४८ लाखाचे कर्ज वाटप केलेले आहे. त्यापोटी दिनांक २२.५.२००२ ला रुपये ८००.०० लाखाची उचल केलेली आहे. उर्वरित रक्कम रु.६००.०० लाखाच्या फेरकर्ज उचलीकरिता राज्य सहकारी बँकेला विनंती करण्यांत येत आहे.

राज्य सहकारी बँकेकडून मंजुर मर्यादेवर उचल घेणे संदर्भात कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार मा. प्रशासक व प्रभारी व्यवस्थापक यांना दिनांक ६।५।२००२ च्या प्रशासकीय ठराव क्रमांक ३ प्रमाणे संयुक्त रित्या देण्यांत आलेले आहे. राज्य सहकारी बँकेने घातलेल्या कर्ज मंजुरीच्या शर्ती व अटी बँकेला मान्य राहणार आहे.

ठराव मंजूर

प्रभारी व्यवस्थापक        प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बँक लि. नागपूर.

*

## प्रशासकीय ठराव दिनांक २७.५.२००२

विषय क्रमांक१:- प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्थांना सन २००१-०२ करिता मंजुर असलेल्या पत मर्यादांना मुदतवाढ देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १:- सन २००१-०२ करिता २५२ प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्थांना रुपये ३०८.४४ लाखाच्या मंजुर असलेल्या पत मर्यादांची मुदत ३१ मार्च २००२ ला संपली आहे. सन २००२-०३ करिता कर्ज नुतनी-करणासाठी सादर केलेल्या प्रकरणांची छाननी व मंजुरीची कार्यवाही पूर्ण करणेसाठी तसेच बऱ्याच संस्थांनी सन २००२-२००३ करिता नुतनीकरणासाठी अर्ज सादर न केल्यास अवधी मिळावा म्हणून सदर संस्थांना मंजुर असलेल्या पत मर्यादा दिनांक १५ मे २००२ पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्यांत आली होती. सद्यस्थितीत ५४ संस्थांनी कर्ज नुतनीकरणासाठी बँकेकडे अर्ज सादर केले आहेत. दिलेली मुदतवाढ संपूनही १९८ संस्थांनी अद्याप कर्ज नुतनीकरणाकरिता बँकेकडे अर्ज सादर केले नाहीत. सदर संस्थांना मंजुर असलेली मुदतवाढ दिनांक १५ मे २००२ला संपली असल्याने या संस्थांच्या कर्ज व्यवहारांत अडचण निर्माण होऊ नये व संस्थांना अर्ज सादर करण्यास अवधी मिळावा म्हणून पुन्हा संधी देण्यांत यावी अशी विणकर संस्थांचे पदाधिकारी यांचे शिष्टमंडळाने बँकेला विनंती केली त्यानुसार सदर संस्थांना पत मर्यादा नुतनीकरण अर्ज सादर करणेसाठी पुन्हा संधी उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे प्रशासकीय ठराव करण्यांत येत आहे.

### प्रशासकीय ठराव

प्राथमिक हातमाग विणकर संस्थांना मंजुर असलेली मुदतवाढ दिनांक १५.५.२००२ ला संपली असल्याने व या कालावधीत संस्थांनी कर्ज नुतनीकरण अर्ज बँकेकडे सादर न केल्यामुळे या संस्थांना कर्जखात्यावर व्यवहार सुरळीत व नियमित करता यावे म्हणून सदर संस्थांना पुन्हा संधी देऊन दिनांक ३० जून २००२ पर्यंत मुदतवाढ देण्यांत यावी तथापी ज्या प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्था सदर कालावधीत कर्ज नुतनी-करणाचे प्रकरण बँकेला सादर करतील अशाच संस्थांना यांचे कर्ज खात्यावर व्यवहार करता येईल. तसेच दिनांक ३० जून २००२ पर्यंत दिलेल्या मुदतवाढीत सदर प्राथमिक हातमाग विणकर संस्थांना पत मर्यादा नुतनीकरणाचे प्रकरण बँकेकडे सादर करण्यास कळवावे असा प्रशासकीय ठराव मंजुर करण्यांत आला.

प्रशासकीय ठराव मंजुर

(सही) (सही)
प्रभारी व्यवस्थापक प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बँक लि; नागपूर.

(7)

# ADMINISTRATIVE RESOLUTION
## DATED 29. MAY 2002.

Subject - SUBMISSION OF APPLICATION FOR REVIVAL PACKAGE FOR CREDIT ASSISTANCE TO THE TUNE OF Rs. 155.00 CRORES.

Proposal - According to the finding of the NABARD Inspection for the period ending 31 March 2001, the networth of the bank has been reduced considerably and the bank has been placed under non-compliance of section 11 of the Banking Regulation Act. 1949 (as applicable to Cooperative societies). Further, following a spate of news paper and media reports, confidence of the depositors has been shaken to a considerable extent. Resultantly, there has been huge withdrawals amounting to Rs. 120.00 crores during the last few weeks, out of which the share of Urban Coop. Bank was to the tune of Rs. 60.00 crores.

Similarly, owing to these media reports and the consequent adverse publicity, the recovery of loans had also been affected adversely as may be evident from the fact that the present level of recovery stood at 19% as against the last year's figure for the corresponding period at 24%.

According to the District Credit Plan of the District, NDCC BANK is required to disburse crop loans worth Rs. 60.00 crores, this year in the Kharip season as against the targeted total disbursement under crop loan for the district at Rs. 85.00 crores. If the present trend of distrust and consequent withdrawls is allowed to continue without any strong corrective measure to re-instill the confidence among the depositors, the bank will be short of funds to the tune of about Rs. 30.00 crores in its disbursement of crop

Loans alone.

The overall impact of these three factors has caused a huge gap in the total cash inflow of the bank which is estimated at Rs.155.00 crores.

In the background of the above, the Manager of the bank proposed that in order to effectively counter the adverse situation thus created, a proposal in the following lines may be resolved and submitted to the commissioner for Cooperation and Registrar, Cooperative Societies, Maharashtra State, Pune and other authorities for revitalising the bank once again:

1) An assistance to the tune of Rs. 50.00 crores to be repaid in five equal annual instalments from Government of India, New Delhi at bank rate.

2) A special "Soft Loan" assistance of Rs.100.00 Crores for a period of ten years to be repaid in ten annual instalments at a subsidised rate of interest from MSC BANK. However, if the rate of interest on some reasons exceeds the bank rate, adequate interest subsidy to that effect should be granted by the Government of Maharashtra.

3) As on the date the share of Government of Maharashtra in the bank's share capital stands at Rs. 39.75 lakhs as against the total Paid-up share Capital of Rs. 1234.97 lakhs, which can be raised to authorised level of share capital of Rs 2000.00 lakhs as per Bye-laws of the bank. With this background the Government of Maharashtra is requested to consider enhancing its share by another Rs. 5.00 crores in order to strengthen the capital base of the bank. For this purpose the Government of Maharashtra is eligible to avail loan from NABARD.

## - ADMINISTRATIVE RESOLUTION -

As proposed by the Manager of the bank and in view of the present critical financial position of the bank - created by huge withdrawals of deposits, resultant fall in recovery percentage and the consequent deficit in the requirement of crop loan disbursements, the following resolution is approved and passed:

"Resolved that the commissioner for Cooperation & Registrar, Cooperative Societies, Maharashtra State, Pune, Government of Maharashtra and other concerned authorities be approached for approval and sanction of the following credit assistance "Revival Package."

1) An assistance to the of Rs. 50.00 crores to be repaid in five equal annual istalments from Government of India, New Delhi at bank rate;

2) A special "Soft loan" assistance of Rs. 100.00 crores for a period of ten years to be repaid in ten annual instalments at a subsidised rate of interest from the Maharashtra State Cooperative Bank Ltd, Mumbai. However, if the rate of interest on some reasons exceeds the bank rate, adequate interest subsidy to that effect should be granted by the Government of Maharashtra.

3) As on date the share of Government of Maharashtra in the banks share capital stands at Rs. 39.75 lakhs as against the total Paid-up share capital of Rs. 1234.97 Lakhs, which can be raised to authorised level of share Capital

of Rs. 2000.00 Lakhs as per Bye-laws of the bank. With this background the Government of Maharashtra is requested to consider enhancing its share by another Rs. 5.00 crores in order to strengthen the capital base of the bank. For this purpose the Government of Maharashtra is eligible to avail loan from NABARD.

Administrative resolution as above approved.

(S. S. Gode)
Manager

(L. B. Patil)
Administrator

The Nagpur District Central Cooperative Bank Ltd.
Nagpur.

## प्रशासकीय ठराव दिनांक ३०.०५.२००२

विषय क्रमांक १ :- कर्मचारी कल्याण निधीचे व्यवहार करणेसाठी निर्णय घेण्याकरिता व चेकवर सह्या करण्याकरीता अधिकार देणेबाबत.

ठराव क्रमांक १ :- बँकेचे दिनांक ६.४.२००० रोजीचे सभेने ठराव क्रमांक १२ नुसार कर्मचारी कल्याण निधीचे नियमास मान्यता दिल्याप्रमाणे नियम क्रमांक १४ मध्ये निधीचे व्यवहार चेकने करण्यांत येतील व चेकवर सह्या करण्याचे अधिकार सरव्यवस्थापक किंवा व्यवस्थापक आणि मुख्याधिकारी (प्रशा.) यांचे संयुक्त सहीने राहतील असे नमुद आहे. परंतु बँकेचे सरव्यवस्थापकपदी परसेवेवर असलेले महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अधिकारी श्री. ए. एन. चौधरी यांना दिनांक ६.५.२००२ रोजी कार्यमुक्त करण्यांत आले आहे. सद्या सरव्यवस्थापक, व्यवस्थापक आणि मुख्याधिकारी (प्रशासन) या तिन्ही पदाच्या चार्ज एकाच अधिकाऱ्याकडे आहे. त्यामुळे निधीचे व्यवहार करतांना चेकवर सह्या करण्यासाठी अडचण निर्माण झाली आहे. तसेच बँकेचे संचालक मंडळ बरखास्त झाल्याने संचालक मंडळाचे जागेवर कारभार पाहण्याकरिता दिनांक ३.५.२००२ पासून बँकेवर प्रशासकाची नियुक्ती झाली आहे त्यामुळे खालील-प्रमाणे प्रशासकिय ठराव घेण्यांत येत आहे.

### - प्रशासकीय ठराव -

सरव्यवस्थापक, व्यवस्थापक व मुख्याधिकारी (प्रशासन) ह्या तिन्ही पदाचा चार्ज एकाच अधिकाऱ्यांकडे असल्याने निधीचे व्यवहार करण्यास अडचण येवू नये म्हणून तुर्तास नियम क्रमांक १४ मध्ये "निधीचे व्यवहार चेकने करण्यांत येतील व चेकवर सह्या करण्याचे अधिकार सरव्यवस्थापक किंवा व्यवस्थापक आणि मुख्याधिकारी (तपासणी) किंवा मुख्याधिकारी (वसुली) यांचे संयुक्त सहीने राहतील". असा निर्णय घेण्यांत आला. तसेच नियम क्रमांक ११ मध्ये प्रमाणे निधीचे कामकाज पाहण्याकरिता असलेल्या समितीचे अधिकार मा. प्रशासक यांना राहतील असाही निर्णय घेण्यात आला. सदर व्यवस्था नविन संचालक मंडळ अस्तित्वांत येईपर्यंत अमलांत राहील.

प्रशासकीय ठराव मंजुर

(सही) प्रभारी व्यवस्थापक

(सही) प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., नागपूर.

## प्रशासकीय ठराव दिनांक ३१.५.२००२

"शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नागपूरचे आलेल्या मुदती कर्ज मागणी अर्जावर निर्णय होऊन कार्यालयीन टिपणीनुसार २० सभासदांना कर्ज वाटपासाठी रूपये ११.४० लाख मुदती कर्ज मासीक ६० हप्ते मुदतीचे मंजूर करण्यांत आहे.

संस्थेला प्रथमतः रूपये ७.०० लाखापर्यंत कर्जवाटप करावे, त्यानंतर माहे मे २००२ कर्जहप्ता वसुलीनंतर उर्वरित रकमेचे कर्जवाटप करावे.

प्रशासकीय ठराव मंजूर."

प्रभारी व्यवस्थापक — प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक म. नागपूर.

---

(११)

## प्रशासकीय ठराव दिनांक ५|६|2002

विषय क्रमांक १ :- सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रूपये २४७.०० लाख फेरकर्ज मर्यादा मंजुरीबाबत व उचल देणेबाबत विनंती करणे.

ठराव क्रमांक १ :- राज्य सहकारी बँकेकडून आपल्या बँकेस अल्पमुदत शेती फेर कर्ज मर्यादा रूपये 2200.00 लाख वर्ष 2001-02 (दिनांक 30|6|2002 पर्यंत) करिता मंजुर आहे. बँकेनी सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्ज वाटपापोटी दिनांक 4|6|2002 पर्यंत रूपये १६४८.९६ लाखाचे वाटप केलेले आहे. या वाटपापैकी राज्य बँकेकडून दिनांक 30|5|2002 पर्यंत रूपये 1800.00 लाखाच्या कर्जाची फेर उचल केलेली आहे. उर्वरित फेर कर्ज उचली करिता (रूपये 247.00 लाखांच्या) प्रशासकीय ठराव घेऊन पाठवावा लागेल.

- प्रशासकीय ठराव -

बँकेनी सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्जापोटी दिनांक 4|6|2002 पर्यंत रूपये १६४८.९६ लाखांचे कर्ज वाटप केलेले आहे. त्यापोटी दिनांक 30|5|2002 पर्यंत रूपये 1800.00 लाखांची उचल केलेली आहे

उर्वरित रक्कम २४७.०० लाखाच्या फेर कर्ज उचलीकरिता राज्य सहकारी बँकेला विनंती करण्यांत येत आहे.

राज्य सहकारी बँकेकडून मंजूर मर्यादेवर उचली घेणे संदर्भात कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार मा. प्रशासक व प्रभारी व्यवस्थापक यांना दिनांक ६।५।2002ला प्रशासकीय ठराव क्रमांक ३ प्रमाणे संयुक्तरित्या देण्यांत आलेले आहे. राज्य सहकारी बँकेने घातलेल्या कर्ज मंजुरीच्या शर्ती व अटी बँकेला मान्य राहणार आहे.

ठराव मंजुर

विषय क्रमांक २:- महाराष्ट्र सहकारी संस्थांचे कायद्यानुसार कर्ज उभारण्याच्या मर्यादेच्या कालावधी वाढवून घेणेकरिता मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक २:- मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी बँकेला बाहेरील कर्ज उभारण्याच्या मर्यादेचा वाढवून दिलेला कालावधी दिनांक ३०।६।२००२ला संपत आहे. तरी सदर मर्यादेचा कालावधी दिनांक ३०।६।२००३ पर्यंत वाढवून मिळण्याकरिता मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना प्रस्ताव पाठवून विनंती करावी लागेल. याकरिता खालील प्रमाणे प्रशासकीय ठराव करण्यांत येत आहे.

- प्रशासकीय ठराव -

दिनांक ३१।३।2002 चे ताळेबंदानुसार ठेवी रुपये ६४६६०.२५ लाख आणि कर्जे व ओव्हर ड्राफ्ट रुपये ९५७.३९ लाख अशी एकुण रुपये ६५६१७.६४ लाख बाकी आहे. दिनांक ३१।३।2002 चे ताळेबंदानुसार भागभांडवल रुपये १२३४.४३ लाख अधिक बचत निधी रुपये ५६१.६५ लाख अधिक इमारत निधी रुपये ३४५.४८ लाख उणे संचयित तोटा नीरंक यांचे बेरजेच्या कायद्यानुसार १२ पट येणारी रुपये २५६६८.७२ ही मर्यादा अपुरी पडत असल्याने बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा पुढील दिनांक ३०।६।२००३ पर्यंत भाग भांडवल अधिक बचत निधी अधिक इमारत निधी उणे तोटा यांचे बेरजेच्या ३५ पटीपर्यंत ठेवण्यास परवानगी व सदर मर्यादेचा कालावधी दिनांक ३०।६।२००३ पर्यंत वाढवून मिळण्यासाठी मा. विभागीय

सह निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे ठरावासह प्रस्ताव पाठवून विनंती करण्यांत यावी असा निर्णय घेण्यात आला. यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. प्रभारी व्यवस्थापक व मा. प्रशासक यांना राहतील.

प्रशासकीय ठराव मंजूर.

प्रभारी व्यवस्थापक    प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि, नागपूर.

---

प्रशासकीय ठराव दिनांक १०।६।२००२

विषय क्रमांक १ :- शेती संस्थांना यांचे सभासद व्याज गाळा रकमेतून (३टक्के मार्जिन) जॉईंट फंड भरण्याकरिता रक्कम वळती करणेबाबत.

ठराव क्रमांक १ :- नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑपरेटीव्ह सोसायटी लि, नागपूर या संस्थेने ३५१ संस्थांचे सभासदांकडून वसुल झालेल्या सभासद व्याज गाळा रुपये १३४.७८ लाख रकमेची जॉईंट फंड भरण्याकरिता मागणी केल्याप्रमाणे बँकेनी दिनांक २०।५।२००२ रोजी प्रशासकीय ठराव घेवुन रुपये १३.५० लाख माहे एप्रील २००२ चे कर्मचार्यांचे पगार व इतर खर्चाकरिता संस्थेचे जॉईंट फंड खात्याला वळती करण्यांत आली आहे. संस्थेने दिनांक ३।६।२००२ रोजी पत्र देवून उर्वरित सभासद व्याज गाळा रकमेतून माहे मे २००२ च्या कर्मचार्यांचा पगार करण्यास रक्कम उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली आहे. याकरिता खालीलप्रमाणे प्रशासकीय ठराव घेण्यांत आला.

प्रशासकीय ठराव

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप. सोसायटी लि; नागपूर या संस्थेने शेती संस्थांचे सभासदांकडून वसुल झालेल्या रकमेपैकी बँकेकडे असलेल्या प्रकरणांतील रुपये १२१.२८ लाख मधून व्याज गाळा माहे मे २००२ च्या संस्थेचे कर्मचार्यांचा पगार करणेकरिता जॉईंट फंड खात्याला वळती करण्यास दिनांक ३.६.२००२ चे पत्राप्रमाणे विनंती केली आहे. गटसचिव हा कर्जवसुलीच

कर्जवाटप यांतील महत्वाचा घटक आहे. करिता गटसचिवांचे माहे मे २००२चे पगार करण्याकरिता रुपये १३.०० लाख सभासद व्याज गाळा रक्कम जॉईंट फंड खात्याला वळती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे, असा प्रशासकीय निर्णय घेण्यांत आला.

प्रशासकीय ठराव मंजूर

ठरावक्र:२-प्रशासकीय ठराव दिनांक १०.६.2002.

"व्यवसाय कर्ज योजने अंतर्गत आलेल्या कर्ज मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जावर निर्णय होऊन, कार्यालयीन टिपणीनुसार मागील वर्षासाठी मंजूर असलेल्या कर्जमर्यादांना पुढील एक वर्षासाठी खालीलप्रमाणे नुतनीकरणास मंजुरी देण्यांत आली.

| संलग्न शाखा | व्यावसायिकाचे नांव | फर्मचे नांव | कर्जाचा प्रकार | नुतनीकरण मंजूर मर्यादा (लाखांत) | मुदत | कर्जउचल पूर्वी व्यवसायाची ठेवीची रक्कम (लाखांत) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सावनेर | १.श्री श्रीराम संतोषराव कडसकर मु.पो.सावनेर | ॲग्रोसर्व्हिस सेंटर,सावनेर | कॅश क्रेडीट | रु.७.०० | ३१-५ 2003 | रु.१.०० |
| लोहारी सावंगा | २.श्री रविकेश नारायण वानखेडे मु.पो.लोहारी सावंगा तह.नरखेड | गायत्री हार्डवेअर | -"- | रु.१.५० | -"- | रु.०.१५ |
| कळमेश्वर | ३.श्री प्रमोद भगवान मिसाळ मु.येरला पो.फेटरी. तह.कळमेश्वर | प्रमोद कृषि सेवा केंद्र उपरवाही | -"- | रु.१.५० | -"- | रु.०.१५ |
| पारशिवनी | श्री मदनलाल किसन लाल पालीवाल मु.पो.पारशिवनी | पालीवाल मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स. | -"- | रु.१.०० | -"- | रु.०.१० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| कोंढाळी | ५.श्री नरेशचंद्र गोवर्धन दास गांधी मु.पो.कोंढाळी त.काटोल | बालाजी कवेलू भंडार | नजरगहाण कॅश क्रेडीट | रु. २.५० | —"— | रु. ०.२५ |
| कळमेश्वर | ६. श्री शरद नथुजी गोतमारे मु.पो. घोराड त. कळमेश्वर | अन्नपूर्णा कृषी सेवा केंद्र | नजरगहाण कॅश क्रेडीट | रु. ०.८० | —"— | रु. ०.१० |
| खापरखेडा | ७ श्री हिरालाल फुलचंद जगने मु.पो. खापरखेडा तह. सावनेर | जगने इलेक्ट्रीकल्स् | नजरगहाण कॅश क्रेडीट | रु. ०.५० | —"— | रु. ०.१० |
| पाटणसावंगी | ८ श्री रमेश लिलाधर सोरते मु.पो. पाटणसावंगी तह. सावनेर | सुमित कृषि सेवा केंद्र | नजरगहाण कॅश क्रेडीट | रु. १.५० | —"— | रु. ०.५० |

वरीलप्रमाणे मुदतीठेव बँकेत गुंतविण्याचे अटीवर कर्जमर्यादा नुतनीकरणास मंजुरी देण्यांत आली."

प्रशासकीय ठराव मंजुर.

---

[signature] प्रभारी व्यवस्थापक

[signature] प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि; नागपूर.

(13)

# ADMINISTRATIVE RESOLUTION
## DATED 15 JUNE 2002.

Subject :- SUBMISSION OF APPLICATION FOR "REVIVAL PACKAGE" FOR CREDIT ASSISTANCE TO THE TUNE OF Rs. 390.00 CRORES.

PROPOSAL :- According to the finding of the NABARD Inspection for the period ending 31 March 2001. the networth of the bank has been reduced considerably and the bank has been placed under non-compliance of section 11 of the Banking Regulation Act 1949 (as applicable to Cooperative Societies). Further following a spate of news paper and media reports, confidence of the depositors has been shaken to a considerable extent. Resultantly, there has been huge withdrawals amounting to Rs. 120.00 crores during the last few weeks, out of which the share of Urban Coop. Bank was to the tune of Rs. 60.00 crores. Similarly, owing to these media reports and the consequent adverse publicity, the recovery of loan had also been affected adversely as may be evident from the fact that the present level of recovery stood at 19% as against the last year's figure for the corresponding period at 24%.

According the district credit plan of the District, NDCC BANK is required to disburse crop loans worth Rs. 60.00 crores, this year in the kharip season as against the targated total disbursement under crop loan for the district at Rs. 85.00 crores. If the present trend of distrust and consequent withdrawals is allowed to continue without any strong corrective measure to re-instill the confidence among depositors, the bank will be short of funds to the tune of about Rs. 30.00 crores in its disbursement of crop loans alone.

The overall impact of these three factors has caused a huge gap in the total cash inflow of the bank which is estimated at Rs. 255.00 crores. In the background of the above, the Manager of the bank proposed that in order to effectively counter the adverse situation thus created, a proposal in the following lines may be resolved and submitted to the commissioner for Cooperation and Registrar, Cooperative societies, Maharashtra State, Pune and other authorities for revitalising the bank once again:

1) An assistance to the tune of Rs. 50.00 crores to be repaid in five equal annual instalments from Government of India, New Delhi at bank rate on the pattern of the Reconstruction scheme of Madhavpura Mercantile Cooperative Bank (MMCB), Ahmedabad, Gujrat state during August 2001.

2) A special "Soft Loan" assistance of Rs. 100.00 crores for a period of 10 years to be repaid in ten annual instalments at a subsidised rate of interest from Maharashtra State Cooperative Bank, However, if the rate of interest on some reasons exceeds the Bank Rate, adequate interest subsidy to that effect should be granted by the Government of Maharashtra.

3) As on date, the share of Government of Maharashtra in the banks share capital stands at Rs. 39.75 lakhs as against the total paid-up share capital of Rs. 1234.97 lakhs, which can be raised to authorised level of share capital of Rs. 2000.00 lakhs, as per Bye-laws of the Bank. The Government of Maharashtra, is therefore, requested to consider enhancing its share by another Rs. 5.00 crores in order to strengthen the capital base of the bank. For this purpose, the Government of Maharashtra is eligible to avail loan from NABARD.

4) As per the provisions of DICGC Act DICGC will meet

its obligation of insurance cover to the depositors of NDCC Bank (Insured Bank) at least on adhoc base. As per the provisions of DICGC Act. relating to corporations obligation to the depositors even in case compromise or arrangement of reconstruction of the Insured Bank the DICGC ~~shold~~ should extend the necessary financial support to the Bank. It is requested that DICGC should grant to the tune of about of Rs.100.00 crores on adhoc basis as a claim of Insurance of depositors on the tine of support extended to Madhaopura Mercantile Cooperative Bank (MMCB) Ahmedabad. The Amount of credit support received from DICGC will be invested in the form of fix deposits with Maharashtra state Cooperative Bank Ltd., for immediate needs and to meet withdrawals by the depositors. This will create confidence in the depositors.

5) The Government of India should issue necessary guarantee to the Urban Cooperative Banks for their deposits with the NDCC Bank, which amounts to Rs135.00 crores as on 31/5/2002 in case the NDCC Bank fails to repay on maturity.

## - ADMINISTRATIVE RESOLUTION -

As proposed by the Manager of the Bank and in view of the present critical financial position of the bank created by huge withdrawals of deposits, resultant fall in recovery percentage and the consequent deficit in the requirement of crop laan disbursements, the follaoing resolution is approved and passed:

"RESOLVED that the commissioner for Cooperation and Registrar, Cooperatives Societies, Maharashtra State Pune Government of Maharashtra and other

concerned authorities be approached for approval and sanction of the following credit assistance "Revival Package"

1) An assistance to the tune of Rs. 50.00 crores to be repaid in five equal annual instalments from Government of India, New Delhi at bank rate on the pattern of the Reconstruction scheme of Madhavpura Mercantile Cooperative Bank (MMCB) Ahmedabad, Gujrat state during August 2001.

2) A special "Soft Loan" assistance of Rs. 100.00 crores for a period of 10 years to be repaid in ten annual instalments at a subsidised rate of interest from Maharashtra State Cooperative Bank. However, if the rate of interest on some reasons exceeds the Bank Rate, adequate interest subsidy to that effect should be granted by the Government of Maharashtra.

3) As on date, the share of Government of Maharashtra in the banks share capital stands at Rs. 39.75 lakhs as against the total Paid-up share capital of Rs. 1234.97 lakhs which can be raised to authorised level of share capital of Rs. 2000.00 lakhs as per Bye-laws of the bank. The Government of Maharashtra, is therefore, requested to consider enhancing its share by another Rs. 5.00 crores in order to strengthen the capital base of the bank. For this purpose the Government of Maharashtra is eligible to avail loan from NABARD

4) As per the provisions of DICGC Act DICGC will meet its obligation on insurance cover to the depositors of NDCC Bank (Insured Bank) at least on adhoc basis. As per the provisions DICGC Act. relating to corporations obligation to the depositors even in case compromise or arrangement of reconstruction of the insured Bank the DICGC should extend the necessary financial support to the Bank. It is requested that

DICGC should grant to the tune of about of Rs. 100.00 crores on adhoc basis as a claim of insurance of depositors on the line of support extended to Madhavpura Mercantile Cooperative Bank (MMCB), Ahemedabad. The amount of credit support received from DICGS will be invested in the form of fixed deposits with Maharashtra state Cooperative Bank ltd. for immediate needs and to meet withdrawals by the depositors. This will create confidence in the depositors.

5) The Government of India should issue necessary guarantee to the Urban Cooperative Banks for their deposits with NDCC BANK, which amounts to Rs. 135.00 crores as on 31/5/2002 in case the NDCC BANK fails to repay on maturity.

Administrative resolution as above approved.

---

Maneger (officiating) Administrator

The Nagpur District Central Cooperative Bank ltd Nagpur.

---

(15)

## प्रशासकीय ठराव दिनांक १८.६.२००२

विषय क्रमांक १ : होम ट्रेड कंपनी लिमिटेड, मे. सेंच्युरी डिलर्स प्रा.लि., गिल्टेज मॅनेजमेंट सर्व्हिसेस लि; व इंद्रमणी मर्चंटस प्रा.लि; ह्यांनी बॅंकेला दिलेले चेकस् त्यांच्या खात्यांत पुरेशी रक्कम नसल्याने परत आल्यामुळे त्यांचेविरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत फौजदारी दावे दाखल करण्याबाबत.

ठराव क्रमांक १ : होम ट्रेड कंपनी लिमिटेड, वाशी मुंबई, मे. गिल्टेज मॅनेजमेंट सर्व्हीसेस लि, मुंबई, मे. सेंच्युरी डिलर्स प्रा.लि. मुंबई व इंद्रमनी मर्चंटस प्रा.लि. कोलकाता ह्या कंपन्यांनी बॅंकेला